# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657

E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३३९ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- + वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## दादा अकाली गेले, दु:खाचा डोंगर आहे पण... सुनेत्रा पवार

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१**



महाराष्ट्र राज्याच्या इतिहासात पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावाची नोंद झाली आहे. राष्ट्रवादी विधिमंडळ पक्षाने सुनेत्रा पवार यांची एकमुखाने गटनेतेपदी निवड केल्यानंतर शपथेची औपचारिकता शनिवारी सायंकाळी पाच वाजता पूर्ण झाली. राजभवनात अत्यंत साध्या पद्धतीने सुनेत्रा पवार यांचा शपथविधी पार पडला. या कार्यक्रमावर दु:खाचे सावट होते.

सुनेत्रा पवार यांनी एवढ्या घाईघाईने शपथ का घेतली? राष्ट्रवादीतील सहकाऱ्यांनी विधिमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी एवढी घाई का केली? असे प्रश्न महाराष्ट्रात चर्चिले जात असताना या सगळ्या प्रश्नांची उत्तरे सुनेत्रा पवार यांनी शपथ घेतल्यानंतर दिली आहे.

दादांच्या अकाली जाण्याने वैयक्तिक आयुष्यातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या मनावर दु:खाचा मोठा डोंगर कोसळला आहे. मात्र त्यांनी दिलेली कर्तव्यनिष्ठा, संघर्षाची ताकद आणि जनतेप्रतीची प्रामाणिक बांधिलकी हाच माझा खरा आधार असल्याचे ते म्हणाल्या.

आज महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताना मन अत्यंत भावुक झाले आहे. आदरणीय अजितदादांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि समाजातील वंचित घटकांसाठी जगण्याचा मंत्र दिला. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेताना 'शिवशाहूफुलेआंबेडकर' यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून कर्तव्यभावनेने ही जबाबदारी स्वीकारत आहे.

दादांच्या अकाली जाण्याने वैयक्तिक आयुष्यातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या मनावर दु:खाचा मोठा डोंगर कोसळला आहे. मात्र त्यांनी दिलेली कर्तव्यनिष्ठा, संघर्षाची ताकद आणि जनतेप्रतीची प्रामाणिक बांधिलकी हाच माझा खरा आधार आहे. त्यांच्या स्वप्नातील न्यायप्रिय, समताधिष्ठित आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी अखंड प्रामाणिकपणे, पारदर्शकतेने आणि लोकाभिमुखतेने काम करत राहीन, हा विश्वास मी आज या निमित्ताने देते.

या कठीण काळात महाराष्ट्रातील जनतेने दिलेले प्रेम, विश्वास आणि पाठिंबा हेच माझे सर्वात मोठे बळ आहे. आपल्या विश्वासाच्या जोरावर, दादांच्या विचारांना उजाळा देत, नव्या आशेने आणि नव्या ऊर्जेने पुढे चालत राहीन. शेतकऱ्यांच्या हितासाठी, युवकांच्या संधींसाठी, महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या प्रत्येक योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे हे माझे सर्वोच्च प्राधान्य असेल.

# सुनेत्रा पवार यांचा शपथविधी

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१**

अजित पवार यांच्या अकाली मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबावर ओढावलेले संकट बाजूला सारून पक्षाच्या धीरोदत्तपणे सुनेत्रा पवार यांनी पुढे येऊन राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली. विधीमंडख गटनेतेपदी त्यांची निवड झाल्यानंतर शनिवारी सायंकाळी त्यांचा शपथविधी झाला. राज्यापाल आचार्य देवव्रत यांनी त्यांना शपथ दिली.

राज्याच्या इतिहासात पहिल्याच महिला उपमुख्यमंत्री म्हणून त्यांची नोंद झाली आहे. अजित पवार यांचे स्मरण करून त्यांनी पद आणि गोपनियतेची शपथ घेतली. यावेळी एकच दादा...अजित दादा अशा घोषणांनी राजभवनाचा सेंट्रल हॉल दुमदुमून गेला होता.

तत्पुर्वी शासकीय निवासस्थान देवगिरी येथे सुनेत्रा पवार यांनी अजित पवार यांच्या छायाचित्राला नमस्कार करून राजभवनाकडे निघाल्या. शपथ घेण्याआधी त्यांनी अजित पवार यांना नमन करून त्यांचे स्मरण केले. उपमुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेण्याआधी त्यांनी अजितदादा यांचे आशीर्वाद घेऊन आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली.



*उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताना सुनेत्रा पवार*

### पवार कुटुंबातील कुणीही नव्हते

सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीला शरद पवार यांच्या कुटुंबातील कुणीही उपस्थित नव्हते. अजित पवार यांचे पुत्र पार्थ यांनी आजोबा शरद पवार यांची भेट घेऊन त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. परंतु, शरद पवार यांनी शपथविधीला उपस्थित राहण्यासंदर्भात कुठलीही प्रतिक्रिया दिली नाही. खासदार सुप्रिया सुळे अर्थसंकल्पासाठी दिल्लीला निघून गेल्या, तर आमदार रोहित पवार विदीप जाधव यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी फलटणला गेले होते.

अजित पवार यांच्या जाण्यामुळे पक्षाचे नेतृत्व कोण करणार, याचे उत्तर त्यांच्या निधनानंतर अवघ्या ७२ तासांत राज्याला मिळाले. राष्ट्रवादीच्या सर्वच ज्येष्ठ नेत्यांनी सुनेत्रा पवार यांची गटनेतेपदी निवड करून वहिनीशिवाय दुसरे कुणीही नेतृत्व करणार नाही याची यथोचित काळजी घेतली. शनिवारी दुपारी सुनेत्रा पवार यांची गटनेतेपदी निवड झाल्यानंतर पक्षातील निर्णयाचे सर्वाधिकार त्यांच्याकडे सोपविले. शपथविधी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जय पवार आणि मंत्रिमंडळातील सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

### राजकारणाचे बाळकडू

सुनेत्रा पवार यांना लहानपणीच राजकारणाचे बाळकडू मिळाले. त्यांच्या माहेरचे पाटील कुटुंब राजकारणातील त्यावेळचे महत्वाचे कुटुंब होते. त्यांचे वडील बाजीराव पाटील हे त्याकाळचे मोठे स्थानिक नेते होते. थेर गाव आणि आसपासच्या बारा वाड्यांचे ते कारभारी पाटील होते. त्यांच्यानंतर त्यांचा मुलगा पद्मसिंह पाटील हे राज्याचे गृहमंत्री होते. त्यांनी दीर्घकाळ शरद पवार यांच्यासोबत काम केले. त्यानंतर त्यांचा वारसा मुलगा राणा जगजीतसिंह पाटील यांनी पुढे नेला. आता सुनेत्रा पवार देखील उपमुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेऊन नव्या आव्हानाला तोंड देण्यासाठी सज्ज झाल्या आहेत.

## नरेंद्र मोदीकडून सुनेत्रा पवारांना शुभेच्छा

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. ३१**

सुनेत्रा पवार यांनी शनिवारी सायंकाळी



उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया फ्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करीत सुनेत्रा पवार यांना शुभेच्छा दिल्या.पंतप्रधान मोदी यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून कार्यकाळ सुरू करणाऱ्या सुनेत्रा पवार यांना शुभेच्छा. मला विश्वास आहे की, त्या राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी अथक परिश्रम करतील आणि दिवंगत अजित पवार यांचे स्वप्न पुढे नेतील.

### पार्थ पवार राज्यसभेवर जाणार

**मुंबई, दि. ३१**

राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यसभा खासदारपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्याजागी पार्थ पवार यांची नेमणूक होणार आहे.

अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी निवड करून त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यामुळे राज्यसभेतील त्यांची जागा रिक्त झाली आहे. या जागेवर पवार कुटुंबातील व्यक्तीची निवड करावी अशी मागणी पक्षातील नेत्यांनी केली आहे.

## शपथविधी राष्ट्रवादीचा की पवार नीतीचा

### थोरल्या साहेबांच्या एकाच चालीने सर्वच मोहरे गार

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१**



राज्याच्या राजकारणात सध्या एका नव्या महानाट्याचा अंक रंगू लागला आहे. आज संध्याकाळी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली खरी, पण या नाटकाचा पडदा उघडण्यापूर्वीच नेपथ्य कुणी केलं आणि पटकथा कुणी लिहिली, याची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात सुरू झाली आहे. राष्ट्रवादीतील घडामोडींचा रिमोट कंट्रोल जरी सध्या इतरांच्या हाती दिसत असला, तरी या राजकीय घड्याळाची खरी चाबी आजही शरद पवार यांच्याच खिशात असल्याचे आजच्या दिवसाने सिद्ध केले आहे.

आज सकाळी बारामतीत शरद पवारांनी घेतलेली पत्रकार परिषद म्हणजे एकाच दगडात अनेक पक्षी मारण्याचा पॉवर गेम होता. सुनेत्रा पवारांच्या शपथविधीबद्दल मला काहीच माहिती नाही, असे सांगून त्यांनी एका झटक्यात या प्रक्रियेपासून स्वतःला आणि पवार कुटुंबाला लांब केले. पण त्याच वेळी, ''१२ फेब्रुवारीला दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार होत्या आणि त्यासाठी अजितदादा आग्रही होते,'' हा गौप्यस्फोट करून त्यांनी सत्तेसाठी घाई करणाऱ्या नेत्यांची गोची केली.

थोरल्या साहेबांनी अतिशय मुरब्बीपणे राज्याच्या राजकारणात ग्रे शेड निर्माण केली आहे:

**कुटुंबाची सुटका:** शपथविधीच्या घाईशी आपला संबंध नाही, हा संदेश देऊन त्यांनी जनतेची सहानुभूती जपली.

**तटकरे–पटेलनिशाण्यावर:** सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हेच या सर्व घडामोडींचे सूत्रधार आहेत, हे नाव न घेता अधोरेखित केले.

**अजितदादांचा सन्मान:** दादांना विलीनीकरण हवे होते, असे सांगून सध्याचे नेते दादांच्या इच्छेविरुद्ध वागत असल्याचा सुप्त संदेश त्यांनी कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवला.

आज राजभवनावर जल्लोष झाला असला तरी, समाजमनात मात्र पवारांच्या सकाळच्या विधानांचे पडसाद उमटत आहेत. भाजपने ही पटकथा लिहिली आहे का? या प्रश्नावर पवारांनी मौन बाळगले असले, तरी चर्चेचा रोख मात्र तिकडेच वळवला आहे. ''घड्याळातील काटे जरी सैरभैर झाले असले, तरी ते पुन्हा जागेवर कसे आणायचे याची कला साहेबांना अवगत आहे.

## सुनेत्रा पवारांच्या घाईच्या निर्णयावर तीव्र प्रतिक्रिया

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१**

अजितदादा पवार यांना जाऊन तीन दिवस झाले असतानाच त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाच्या



घेतलेल्या निर्णयावर अनेक नेत्यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

अजितदादांची अजून राख शांत झाली नाही. अशा स्थितीत सुनेत्रा पवारांनी एवढ्या घाईत निर्णय घ्यायला नको होता. त्यांना हा निर्णय घेण्यामागे बोलविता धनी कोण अशी प्रतिक्रिया आमदार अनिल पाटील व्यक्त केली. ही काळाची गरज असेलही तरी सुद्धा एवढ्या लवकर निर्णय घ्यायला नको होता असेही पाटील म्हणाले.

**संजय राऊत**

शिवसेना उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी देखील आपली तिखट प्रतिक्रिया व्यक्त केली. सुनेत्रा पवार यांनी कुठलाही निर्णय हा विचारपूर्वक



घ्यायला हवा होता. निर्णय घेण्याची त्यांना का घाई झाली होती. पक्षातील नेत्यांना आपले वजन कमी होऊ नये यासाठी त्यांना हा निर्णय घ्यायला लावला तर नाही ना असेही संजय राऊत म्हणाले.

**रोहित पवार**

राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्राकाकी यांनी शपथ घेतली याचा आनंद आहे. खर म्हणजे, जितदादांची जागा कुणीच घेऊ शकत नाही. परंतु, किमान



सुनेत्राकाकीच्या रुपात आम्ही तेथे अजितदादांना पाहू. डोक्यावर डोंगराऐवढे दु:ख असताना आणि आम्ही सर्वजन शोकाकूल असताना त्यांना शुभेच्छा तरी कशा द्याव्यात अशी प्रतिक्रिया आमदार रोहित पवार यांनी दिली.

## रामकृष्ण हरी म्हणत सुप्रिया सुळेंनी हात जोडले

**वृत्तसंस्था**
**बारामती, दि. ३१**

सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मात्र, या शपथविधीवरून पवार गटात दोन गट पडल्याचे चित्र दिवसभर दिसून आले.



सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीची घोषणा होताच शरद पवार, सुप्रिया पवार, रोहित पवार हे बारामतीच थांबले. सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांच्या काटेवाडीतील निवासस्थानी गेल्या होत्या. आणि अजितदादांच्या मातोश्री आशा पवार यांची भेट घेतली. त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. यावेळी पत्रकारांनी त्यांना छेडले असता अर्थसंकल्प असल्याने मी दिल्लीला जात आहे. त्यासाठी आशा काकूंची परवानगी घ्यायला गेले होते. सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीबाबत विचारणा केली असता हात जोडत त्यांनी रामकृष्ण हरी असे म्हणत निघून गेल्या.

## अजितदादांच्या निधनानंतर राष्ट्रवादीत सत्तासंघर्ष

### तटकरे–पटेलांच्यखेळीवर दानवेंचा प्रहार

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१**

महाराष्ट्र अद्याप अजितदादांच्या निधनाच्या धक्क्यातून सावरलेला नाही, तोच राज्याच्या राजकारणात पॉवर गेमला हिणकस वळण लागले आहे. सुनेत्रा पवार यांच्या संभाव्य शपथविधीवरून शिवसेना (ठाकरे गट) नेते अंबादास दानवे यांनी सत्ताधारी राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेतृत्वावर तोफ डागली आहे. ''सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे नेते स्वतःच्या स्वार्थासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतात,'' असे खळबळजनक विधान करत दानवे यांनी राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे.

अजितदादांच्या एक्झिटला अवघे चार दिवस झाले असतानाच सत्तेची पदे वाटली जात असल्याबद्दल दानवे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. ''कुटुंबात



आणि राज्यात अजूनही दुखवटा आहे, अशा वेळी खुर्चीसाठी होणारी ही धावपळ संतापजनक आहे,'' अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. तटकरे आणि पटेल यांनी केवळ आपली मंत्रिपदे आणि पक्षावरील ताबा सुरक्षित करण्यासाठी सुनेत्रा वहिनींना ढाल म्हणून वापरल्याचा आरोप त्यांनी केला आहे. शरद पवारांनी आज सकाळी केलेल्या खळबळजनक गौप्यस्फोटाचा आधार घेत दानवे यांनी सत्ताधाऱ्यांची कोंडी केली. जर १२ तारखेला दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार होत्या, तर मग आताच वेगळ्या शपथविधीची ही घाई कशासाठी? यावर भाष्य करताना दानवे म्हणाले: ''तटकरे आणि पटेलांना एक अनामिक भीती सतावत आहे. जर शरद पवार पुन्हा सक्रिय झाले, तर त्यांचे राजकीय अस्तित्व धोक्यात येईल. याच भीतीपोटी त्यांनी अजितदादांच्या इच्छेविरुद्ध जाऊन सत्तेचा हा नवा डाव मांडला आहे.''

अजितदादांच्या निष्ठावान कार्यकर्त्यांच्या भावना अद्याप अनावर आहेत, तरीही मुंबईत मंत्रिपदाच्या आणि शपथविधीच्या चर्चा रंगत आहेत. ''या नेत्यांना ना नात्यांचे सोयरसुतक उरले आहे, ना निधनाचे गांभीर्य,'' असे म्हणत दानवे यांनी थेट राजकीय नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## राष्ट्रवादीचा अध्यक्ष पाटील असावा, पटेल नाही! राज ठाकरे

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१**



महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अनपेक्षित घडामोडींवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी अखेर मौन सोडले आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार गट) सुरू असलेल्या सत्तेच्या खेचाखेचीवर राज ठाकरेंनी अत्यंत तिखट शब्दांत भाष्य केले आहे. ''राष्ट्रवादीचा अध्यक्ष कोणीही मराठी असावा, पाटील असावा पण पटेल नाही!'' असे खळबळजनक ट्विट करत राज ठाकरेंनी थेट प्रफुल्ल पटेल यांच्यासह राष्ट्रवादीच्या धोरणांवर प्रहार केला आहे.

राज ठाकरेंनी आपल्या पोस्टची सुरुवातच सध्याच्या राजकीय स्थितीवर नाराजी व्यक्त करून केली. ते म्हणाले: ''महाराष्ट्राच्या राजकारणाचा गेल्या काही काळात पार विचका झाला आहे, त्यावर खरंतर भाष्य पण करावं असं वाटत नाही. पण तरीही आज दिवसभर ज्या घडामोडी सुरू आहेत त्यावर बोलावंच लागेल.''

राज ठाकरेंच्या या विधानातून राज्यातील फोडाफोडीच्या राजकारणाबद्दल आणि अजितदादांच्या निधनानंतर अवघ्या काही तासांत सुरू झालेल्या पदग्रहणाच्या घाईबद्दल असलेली चीड स्पष्टपणे जाणवत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष मुळात ग्रामीण महाराष्ट्राच्या आणि मराठमोळ्या मातीतील पक्ष म्हणून ओळखला जातो. याच मुद्द्याला हात घालत राज ठाकरेंनी थेट प्रफुल्ल पटेल यांच्याकडे असलेल्या पक्षीय अधिकारांवर आणि त्यांच्या वाढत्या प्रभावावर निशाणा साधला आहे. सुनेत्रा पवार यांच्या गटनेतेपदी निवडीत आणि शपथविधीच्या रणनीतीत प्रफुल्ल पटेल यांची भूमिका महत्त्वाची मानली जात आहे. त्यावरच राज ठाकरेंनी पाटील विरुद्ध पटेल असा वाद छेडून राष्ट्रवादीतील जुन्या कार्यकर्त्यांच्या मनातली खदखद बाहेर आणली आहे. आज सकाळी शरद पवारांनीही ''मला सुनेत्राच्या शपथविधीची कल्पना नव्हती'' असे सांगत तटकरे आणि पटेल यांच्यावर सूचक टीका केली होती. आता राज ठाकरेंनीही थेट पटेल यांचा उल्लेख केल्यामुळे, राष्ट्रवादीच्या फुटीर गटातील नेत्यांची कोंडी झाली आहे. राज ठाकरेंच्या या भूमिकेमुळे राष्ट्रवादी हा प्रादेशिक आणि मराठी पक्ष म्हणून आपली ओळख हरवत आहे का? असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

## कठीण प्रसंगी सुनेत्रावहिनींचा निर्णय धाडसी आणि कौतुकास्पद : फडणवीस

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१**




उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर निर्माण झालेल्या राजकीय पेचप्रसंगात सुनेत्रा पवार यांनी घेतलेल्या निर्णयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तोंडभरून कौतुक केले आहे. ''प्रसंग कठीण होता, पण ज्या धीरोदात्तपणे सुनेत्रावहिनींनी महाराष्ट्र हिताचा निर्णय घेतला, तो कौतुकास्पद आणि धाडसी आहे,'' अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या निर्णयाचे समर्थन केले आहे. सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यावर मुख्यमंत्र्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, हा प्रसंग आनंदाने शुभेच्छा देण्याचा नसून दु:खाचा आहे. मात्र, अशा स्थितीतही सुनेत्रा पवार यांनी दाखवलेली कर्तव्याप्रतीची प्रतिबद्धता वाखाणण्याजोगी आहे. अजितदादांचा लोकाभिमुख वारसा त्या समर्थपणे पुढे चालवतील, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्राला पहिल्या महिला उपमुख्यमंत्री लाभल्याचा उल्लेख करत मुख्यमंत्री म्हणाले की, सुनेत्रा पवार यांची ही कारकीर्द राज्यासाठी यशस्वी ठरेल. ''भाजपा आणि महायुती सरकार या कठीण काळात अजितदादा पवार यांच्या कुटुंबीयांच्या आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे,'' अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

अजितदादांच्या निधनानंतर सरकारमधील राष्ट्रवादीच्या सहभागाबाबत आणि नेतृत्वाबाबत अनेक चर्चा सुरू होत्या. मात्र, सुनेत्रा पवार यांच्या निवडीमुळे महायुती सरकारमधील समन्वय आणि प्रशासकीय स्थैर्य कायम राहील, असा संदेश मुख्यमंत्र्यांच्या या भूमिकेतून स्पष्ट झाला आहे.

## शपथविधीसंदर्भात माझ्याशी चर्चा नाही : शरद पवार

**मुंबई, दि. ३१**



सुनेत्रा पवार यांनी शपथविधीसंदर्भात माझ्याशी कसलीही चर्चा केली नाही असे शरद पवार यांनी पत्रपरिषदेत सांगितले. शरद पवार यांच्या या निर्णयावरून ते नाराज असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

आमच्या कुटुंबातील कुणीही या शपथविधीला जाणार नाही असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील आणि पर्यायाने पवार कुटुंबातील राजकारण वेगळ्या दिशेने जाण्याची शक्यता असल्याची राजकीय वर्तुळात आहे.

बारामती येथील शरद पवार यांच्या निवासस्थानी झालेल्या पत्रपरिषदेत अजित पवार यांच्या निधनाला फक्त चार दिवस झाले आहेत. असे असतानाही शपथविधी होत आहे असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता पवार यांनी हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत निर्णय आहे. सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांनी पुढाकार घेतला आहे. यो दोन्ही नेत्यांनी त्यांच्या प्राथमिकता स्पष्ट केल्या आहेत.

## अजित पवारानंतर पुण्याचे पालकमंत्री कोण होणार, चर्चा सुरू

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राजकीयदृष्ट्या अनेक प्रश्न निर्माण झाले असतानाच आता आगामी काळात पुण्याचे पालकमंत्रीपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे कायम राहणार की, भाजपकडे जाणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे. पुण्याचे पालकमंत्रीपद भाजपकडे असावे असे पुण्यातील नेत्यांची इच्छा होती. त्यामुळे आता भाजप यासंदर्भात नेमकी काय भूमिका घेत हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीत सहभागी झाल्यानंतर पुण्याचे पालकमंत्रीपद चंद्रकांत पाटील यांच्याकडे देण्यात आले होते. या अटीवरच अजित पवार महायुतीत सहभागी झाले होते. मात्र, भाजपचे ९ आणि राष्ट्रवादीचे ८ आमदार असतानाही पुण्याचे पालकमंत्रीपद राष्ट्रवादीकडे गेल्याचे शल्य भाजपच्या स्थानिक नेत्यांना होते. अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे पुण्याचे पालकमंत्रीपद पुन्हा भाजपकडे जाणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाल्यामुळे बारामती विधानसभेच्या रिक्त झालेल्या जागेवर सुनेत्रा पवार पोटनिवडणुकीतील उमेदवार असतील हे स्पष्ट आहे. उपमुख्यमंत्री पदासोबतच त्या पुण्याचे पालकमंत्रीपदाची धुरा सांभाळणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे भाजपकडून पालकमंत्रीपदाची मागणी केल्या जाऊ शकते. तसे झाल्यास चंद्रकांत पाटील यांच्याकडे पालकमंत्रीपद येऊ शकतो. मात्र, पालकमंत्रीपद राष्ट्रवादीला द्यायचे की, स्वत:कडे ठेवायचे याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

## सुनेत्रा वहिनींकडे पॉवर की केवळ मंत्रिपद

### अजितदादांचं वित्त खातं नाकारल

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१**

महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांनी शपथ घेतल्यानंतर सर्वांच्या नजरा लागल्या होत्या त्या त्यांच्या खातेवाटपाकडे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे असलेली वित्त आणि नियोजन सारखी वजनदार खाती सुनेत्रा वहिनींकडे जाणार, असा कयास लावला जात होता. मात्र, नुकत्याच जाहीर झालेल्या खातेवाटपाने राजकीय वर्तुळात सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. अजितदादांचा बजेटवरील शब्द अंतिम असायचा, मात्र सुनेत्रा वहिनींना वित्त आणि नियोजन खात्यापासून दूर ठेवण्यात आलं आहे.

सुनेत्रा पवार यांच्याकडे ही तीन खाती: अजितदादांच्या निधनानंतर रिक्त झालेली सर्व खाती वहिनींकडे न देता, त्यांच्याकडे केवळ तीन खात्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे:

१. राज्य उत्पादन शुल्क : महसूल मिळवून देणारं हे महत्त्वाचं खातं त्यांच्याकडे देण्यात आलं आहे. २. क्रीडा आणि युवक कल्याण: तरुणांशी जोडलेलं हे खातं आता वहिनींच्या नियंत्रणात असेल. ३. अल्पसंख्याक विकास आणि औकाफ: सामाजिक समतोल राखण्याच्या दृष्टीने हे खातं महत्त्वपूर्ण मानलं जातं.

अजितदादांचा प्रशासनावरील वचक हा त्यांच्याकडे असलेल्या तिजोरीच्या चाब्या म्हणजेच वित्त खात्यामुळे होता. मात्र, सुनेत्रा वहिनींना हे खातं न दिल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत:

हे खातं मुख्यमंत्री स्वतःकडे ठेवणार की महायुतीतील इतर ज्येष्ठ नेत्याकडे (उदा. देवेंद्र फडणवीस) जाणार?

राष्ट्रवादीच्या इतर ज्येष्ठ नेत्यांना (भुजबळ किंवा मुंडे) या महत्त्वाच्या खात्यावर डोळा आहे का?

सुनेत्रा वहिनींना प्रशासकीय अनुभवाअभावी या महत्त्वाच्या खात्यापासून लांब ठेवण्यात आलं आहे का?




युवाराष्ट्र दर्शन

# चंद्रपूर जिल्हा

रविवार दि.१ फेब्रुवारी २०२६



## चार वर्षांच्या अधीर जुन्नावारचा राष्ट्रीय सुवर्ण पराक्रम.. आर्य वैश्य समाजातर्फे सन्मान

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.३१ :** श्री विश्व कन्यका आर्य वैश्य समाज बहुउद्देशीय संस्था, रामनगर, चंद्रपूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'मनोमिलन २०२६' उपवर-उपवधू परिचय मेळाव्यात समाजाचा अभिमान ठरलेल्या अवघ्या चार वर्षांच्या अधीर अमृता सुबोध जुन्नावार याचा राष्ट्रीय स्तरावरील इनलाईन स्केटिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवल्याबद्दल सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.या मेळाव्याच्या निमित्ताने केवळ विवाहयोग्य युवक-युवतींचा परिचयच नव्हे, तर समाजातील गुणवंत, कर्तृत्ववान आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्याची परंपरा समाजाने जपली असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले.अधीर जुन्नावार हा चंद्रपूर येथील माउंट कार्मेल कॉन्वेंट स्कूल येथे नर्सरी वर्गात शिक्षण घेत असून, इतक्या लहान वयात त्याने इनलाईन स्केटिंग या क्रीडा प्रकारात राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवून चंद्रपूर शहरासह संपूर्ण आर्य वैश्य समाजाचे नाव देशपातळीवर उज्ज्वल केले आहे. विशेष म्हणजे, या वयोगटात राष्ट्रीय पातळीवर असे यश मिळवणारा अधीर हा दुर्मिळ उदाहरण ठरला आहे.अधीरच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत मनोमिलन २०२६ उपवर-उपवधू परिचय मेळाव्यात समाजाच्या वतीने त्याचा विशेष सन्मान करण्यात आला. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकारिणी समितीने अधीरला सन्मानचिन्ह देत त्याच्या उज्ज्वल भवितव्याबाबत शुभेच्छा दिल्या. यावेळी समाजबांधवांकडून टाळ्यांच्या गजरात अधीरचे अभिनंदन करण्यात आले.

# भाजपाची गटनोंदणी व काँग्रेसच्या एका गटातील तटस्थ भूमिकाकडे सर्वांचे लक्ष

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.३१ :** महानगरपालिकेतील सत्तास्थापनेच्या पार्श्वभूमीवर भाजपाची गटनोंदणी आणि काँग्रेसच्या एका गटाने घेतलेली तटस्थ भूमिका हे सध्या राजकीय चर्चेचे केंद्रबिंदू ठरले आहे. महापौर व उपमहापौर निवडणुकीच्या तोंडावर सुरू असलेल्या हालचालींमुळे शहरातील सत्तासमीकरण अधिकच गुंतागुंतीचे बनले आहे.

मनपा महापौर व उपमहापौर पदाची निवडणूक १० फेब्रुवारी रोजी होणार आहे.नामनिर्देशपत्र ५ फेब्रुवारी रोजी दाखल करावयाचे आहे.आतापर्यंत शिवसेना (उबाठा) व वंचित बहुजन आघाडी यांनी मिळून ८ नगरसेवकांची गटनोंदणी नागपूर विभागीय आयुक्तांकडे केली आहे.तसेच खासदार प्रतिभा धानोरकर गटातील काँग्रेसच्या १३ नगरसेवकांनी गटनोंदणी केली आहे.मात्र १४ नगरसेवकांनी अद्यापपर्यंत काँग्रेसच्या अधिकृत गटात सामील होण्याबाबत शपथपत्र दिले नाही.तसेच निवडणुकी दरम्यान काँग्रेस सोबत आघाडी केलेल्या शेकाप (पप्पू देशमूख) व एमआयएम ने मिळून ४ जणांची स्वतंत्र गट नोंदणी केली आहे.

दुसरीकडे भाजपाने अद्यापपर्यंत गटनोंदणी केली नाही.सोमवार २ फेब्रुवारी रोजी भाजपाचे २३ व शिवसेना (शिंदे) १ अशा २४ नगरसेवकांची गटनोंदणी केली जाणार आहे.या गटात २ नगरसेवक सामील होण्याची शक्यता असल्याचे सुत्रांकडून सांगण्यात येत आहे..हे दोन नगरसेवक कोण आहेत याबाबत स्पष्टता नसून, २ फेब्रुवारी रोजी भाजपाच्या गटनोंदणीमध्ये स्पष्ट होणार आहे.दुसरीकडे काँग्रेसच्या अधिकृत गटनोंदणीत सामील न झालेले १४ नगरसेवक तटस्थ भूमिकेत आहे.यामूळे सर्वांची उत्सुकता वाढली आहे.

या गटाने कोणत्याही आघाडीस स्पष्ट पाठिंबा जाहीर न केल्यामुळे महापौर निवडणुकीत त्यांची भूमिका निर्णायक ठरू शकते, असे जाणकारांचे मत आहे. काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद अद्याप पूर्णपणे मिटले नसल्याचे संकेत या भूमिकेतून मिळत असल्याची चर्चा आहे.२ फेब्रुवारी रोजी गटनोंदणीची अंतिम स्थिती स्पष्ट होणार असून त्यानंतरच सत्तेचे अंतिम गणित ठरणार आहे. तोपर्यंत काँग्रेसच्या तटस्थ गटाची भूमिका आणि भाजपाची पुढील रणनीती याकडे चंद्रपूरच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## एकत्रित गटनोंदणी केल्यास उबाठाला महापौरपदाचा भाजपाकडून प्रस्ताव !




मनपा सत्तास्थापनेच्या हालचाली निर्णायक टप्प्यात पोहोचल्या असून भाजपाने शिवसेना (उबाठा) गटा-समोर महत्त्वाचा प्रस्ताव ठेवल्याची माहिती राजकीय वर्तुळातून समोर येत आहे. दोन्ही पक्षांनी एकत्रित गटनोंदणी केल्यास अडीच वर्षांसाठी महापौरपद शिवसेना (उबाठा) गटाला देण्याची तयारी भाजपाने दर्शविल्याची जोरदार चर्चा सुरू आहे.महापौर व उपमहापौर निवडणूक जवळ आल्याने स्थिर सत्तेसाठी संख्याबळाची जुळवाजुळव वेगाने सुरू आहे. शिवसेना (उबाठा) गटाकडे असलेल्या निर्णायक नगरसेवकांमुळे त्यांची भूमिका किंगमेकर ठरत आहे. या पार्श्वभूमीवर भाजपाने सत्तेची वाटणी सूत्र पुढे करत उबाठा गटाला पहिल्या टर्ममध्ये महापौरपद देण्याचा प्रस्ताव दिल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे उर्वरित अडीच वर्षांसाठी महापौरपद भाजपाकडे राहील, असा तत्त्वतः फॉर्म्युला चर्चेत असल्याचे समजते.सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार भाजपाकडून स्वतंत्र गटनोंदणीऐवजी एकत्रित गटनोंदणीवर विशेष भर दिला जात आहे. एकसंघ गट तयार झाल्यास स्थिर सत्ता आणि निर्णयक्षम प्रशासन देता येईल, असा भाजपाचा दावा आहे. मात्र शिवसेना (उबाठा) गटामध्ये या प्रस्तावावर सखोल चर्चा सुरू असून लिखित हमी, पदवाटपाचा स्पष्ट करार आणि पुढील अडीच वर्षांनंतरच्या समीकरणांबाबत खात्री करण्याची मागणी होत असल्याची माहिती आहे.मात्र, शिवसेना (उबाठा) व वंचित ने मिळून आधीच ८ नगरसेवकांची गटनोंदणी केली आहे.त्यांना भाजपाच्या एकत्रित गटनोंदणीत सामील होण्यासाठी कायदेशिररित्या पूर्वी केलेली गटनोंदणी रद्द करावी लागणार आहे.भाजपाच्या प्रस्तावातून उबाठाला बांधून ठेवण्यासाठी ही रणनीती समोर केल्याचे समजते.शिवसेना (उबाठा), भाजपाचा ह्र प्रस्ताव स्वीकारतो की नवा पर्याय शोधते, यावर आगामी सत्तासमीकरण अवलंबून राहणार आहे.

# डॉ.पी.एम.काटकर यांना उत्कृष्ट प्राचार्यांचा प्रथम पुरस्कार



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.३१ :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या 'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात येथील सरदार पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम .काटकर यांना उत्कृष्ट प्राचार्यांचा प्रथम पुरस्कार मिळाला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता यांचे संयुक्त विद्यमाने 'करिअर कट्टा 'उपक्रम राबविला जात आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एम. काटकर यांच्या मार्गदर्शनात सदर 'करिअर कट्टा' उपक्रम महाविद्यालयात घेतला जात आहे. त्याच अंतर्गत घेण्यात आलेल्या २०२४-२५ सत्रात राज्यस्तरीय महाविद्यालयीन स्पर्धेत सरदार पटेल महाविद्यालयास 'बी' ग्रेड सह 'सेंटर ऑफ एक्सलन्स' चा दर्जा मिळाला होता. त्यामुळे 'करिअर कट्टा' कडून दिल्या जाणाऱ्या अनुदाना अंतर्गत महाविद्यालयास साधनसामग्री प्राप्त झालेली होती. दरम्यान यंदा याच उपक्रमांतर्गत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात सरदार पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम .काटकर यांना चंद्रपूर जिल्हास्तरीय उत्कृष्ट प्राचार्यांचा प्रथम पुरस्कार मिळाला आहे.

महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,करिअर कट्टा' ची चमू व सतत सहयोग देणारे सर्वोदय शिक्षण मंडळ यांच्या सामूहिक प्रयत्नांची ही फलश्रुती असल्याचे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एम.काटकर यांनी व्यक्त केले. त्यामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.दरम्यान सर्वोदय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अरविंद पोरेड्डीवार, कार्याध्यक्ष आ. किशोर जोरगेवार, उपाध्यक्ष सुदर्शन निमकर, सगुणाताई तलांडी, सचिव प्रशांत पोटदुखे, सहसचिव डॉ. किर्तीवर्धन दीक्षित, कोषाध्यक्ष संदीप गड्डमवार, सर्वोदय शिक्षण मंडळाचे कार्यकारी सदस्य, राकेश पटेल, एस.रमजान सुरेश पोटदुखे, जिनेश पटेल यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. काटकर यांच्यासह या उपक्रमाचे समन्वयक प्रा. संदेश पाथर्डे व डॉ. प्रकाश बोरकर यांचे अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## प्रत्येक बुधवारला महिलांसाठी रजोनिवृत्ती क्लिनीक

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.३१ :** सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून राज्यातील महिलांचे आरोग्य सुदृढ राखणे, विशेषतः रजोनिवृत्ती कालावधीत महिलांमध्ये होणाऱ्या शारीरिक, मानसिक व हार्मोनल बदलावर योग्य वेळी वैद्यकीय उपचार, तपासणी व समुपदेशन उपलब्ध करून देण्याकरीता १४ जानेवारी २०२६ मकर संक्रांतीचे औचित्य साधून राज्यभरात रजोनिवृत्ती (मेनोपाज) क्लिनिक सुरू करण्यात आले.

सदर योजनेच्या प्रभावी सुसूत्र अंमलबजावणी करण्याकरीता खालील पद्धतीने निर्देश देण्यात आले. महाराष्ट्रातील सर्व ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालय, ज्या ठिकाणी स्त्रीरोगतज्ञ उपलब्ध आहे, अशा ठिकाणी यापद्धतीचे विशेष क्लिनिक सुरू करण्यात आले आहे, चंद्रपूर जिल्ह्यात उपजिल्हा रुग्णालय वरोरा, चिमूर राजुरा, मुल, ब्रह्मपुरी व बल्लारपूर या ठिकाणी प्रामुख्याने हे क्लिनिक सुरू करण्यात आले आहे, या क्लिनिकमध्ये आठवड्यातून एक दिवस म्हणजे प्रत्येक बुधवारी मेनोपाज ओपीडी सुरू करण्यात आली आहे.यात स्त्रीरोग तज्ञाकडून तपासणी, आवश्यक वैद्यकीय तपासण्या, औषधोपचार, आहार व जीवनशैली विषयक मार्गदर्शन आणि मानसिक आरोग्य विषयक समुपदेशन करण्यात येत आहे. कारिता महिलांनी प्रामुख्याने ४५ ते ५० वयोगटातील महिलांनी सदर सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ताडाळी येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.३१ :** ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ताडाळी येथे ध्वजारोहणाचा भव्य व शिस्तबद्ध कार्यक्रम उत्साहात पार पडला. बँकेचे संचालक तसेच काँग्रेस नेते दिनेशदादा पाटील चोखारे यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज फडकवण्यात आला.

ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण बँक परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमास बँकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येत राष्ट्रीय एकात्मतेचा आणि संविधानिक मूल्यांचा संदेश दिला.यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना दिनेशदादा पाटील चोखारे यांनी संविधानाने दिलेल्या अधिकारांसोबतच नागरिकांनी आपल्या कर्तव्यांचीही जाणीव ठेवणे आवश्यक असल्याचे सांगितले. सहकार क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी प्रामाणिक सेवा, पारदर्शकता व शिस्त या मूल्यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे बँक परिसरात उत्साह, अभिमान आणि देशभक्तीचे वातावरण अनुभवायला मिळाले.यावेळी शाखाधिकारी गजानन भोयर, शाखाधिकारी श्री. सुरेश निखाडे, कर्मचारी श्याम चव्हान तसेच शिपाई राहुल मालेकर उपस्थित होते.

# तेलगू समाजाच्या सांस्कृतिक, पारंपरिक उत्सवाचे केंद्रस्थान असलेल्या मैदानाचा विकास करणार - आ.किशोर जोरगेवार

### १ कोटी रुपयांच्या निधीची घोषणा ; नकोडा येथे समक्का-सारक्का कार्यक्रमाचे आयोजन



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.३१ :** चंद्रपूर शहरातील नकोडा परिसरात मोठ्या संख्येने तेलगू भाषिक बांधव वास्तव्यास आहेत. आपली संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकोपा जपत आपण येथे वास्तव्यास आहात, हे निश्चितच अभिमानास्पद आहे. आज येथे आयोजित करण्यात आलेल्या पारंपरिक समक्का-सारक्का उत्सवात सहभागी होण्याचे भाग्य मला लाभले, याचा मला विशेष आनंद होत आहे.

कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले मैदान हे तेलगू भाषिक बांधवांच्या सांस्कृतिक पारंपारिक उत्सवाचे केंद्रस्थान असून, त्याच्या विकासासाठी १ कोटी रुपयाचा निधी देण्यात येईल, अशी घोषणा आमदार किशोर जोरगेवार यांनी केली.

समक्का-सारक्का समिती, नकोडा आणि भारतीय जनता पार्टीच्या वतीने नकोडा येथे समक्का-सारक्का कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी नकोडाचे सरपंच किरण बांदुरकर, भारतीय जनता पार्टीचे महामंत्री नामदेव डाहुले, बृजभूषण पाझारे, आशिष मासिरकर, ममता मोरे, शीतल तोडा, विक्की रंगमपल्लीवार, पराग आक्कुलवार, सादिक शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले की, येथील तेलगू भाषिक समाज हा सामाजिक बांधिलकी जपणारा, परिश्रमशील आणि एकात्मतेचा आदर्श आहे. शिक्षण, संस्कृती आणि सामाजिक कार्य या क्षेत्रांत आपण मोलाचे योगदान दिले आहे. आपल्या सर्वांगीण विकासासाठी मी नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली असून, भविष्यातही तीच भूमिका कायम राहील.नकोडा परिसराचा समग्र व नियोजनबद्ध विकास व्हावा, यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. आज ज्या ठिकाणी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, ते तेलगू भाषिक बांधवांचे केंद्रस्थान आहे. या केंद्रस्थानाचा विकास होणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे या परिसरातील आवश्यक विकासकामांसाठी १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी यावेळी केली.नकोडा परिसराचा विकास हे आपले ध्येय असून, रस्ते, सभागृह, मूलभूत सुविधा आणि सामाजिक उपक्रम यांसाठी पुढील काळातही लोकहिताची कामे सातत्याने केली जातील.

## डॉ.खत्री महाविद्यालयात तारामंडळ ओळख विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.३१ :** स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर येथे आज दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी तारामंडळ (फिरते नभांगण) ओळख या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. हा उपक्रम संकलन महाराष्ट्र राज्य सहकार्य व वैज्ञानिक जाणीव शिक्षण या कार्यक्रमांतर्गत आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात व्हिडिओ चित्रफितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अवकाशगंगेची निर्मिती, तारामंडळाची रचना, विविध ग्रहांची माहिती तसेच पृथ्वीच्या ग्रहांचे कालचक्र याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत शास्त्रीय माहितीची उत्सुकतेने नोंद घेतली .

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. पी. एम. जाधव व श्री. संजय कांबळे यांनी ९५ विद्यार्थ्यांना तारामंडळ ग्रहाची स्थिती आणि वैशिष्ट्ये याबाबत सखोल माहिती दिली. तसेच सदर कार्यक्रमाला संस्थेचे सचिव डॉ. एस. बी. कपूर, कोषाध्यक्षा प्रा. अनुश्री पाराशर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुवर्णा राऊत यांनी केले तर मान्यवरांचे आभार डॉ. दिपाली दांडेकर यांनी मानले. कार्यक्रमाकरीता प्रा.सादलवार, प्रा. नाट, प्रा. पॉल, प्रा. गायकवाड, प्रा. नागपुरे, प्रा. मोहितकर तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये खगोलशास्त्राबाबत आवड निर्माण होऊन वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लावण्यास मदत होणार आहे.

## डॉ.खत्री महाविद्यालयात वर्ग १२ वी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.३१ :** स्थानिक डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथील कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने वर्ग बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ उत्साहात आणि भाऊक वातावरणात संपन्न झाला. विज्ञान शाखेच्या कार्यक्रमप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे सर होते तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या कोषाध्यक्षा अनुश्री पाराशर सोबतच डॉ. टि. एम. शेख, प्रा. लेनगुरे, प्रा. तरफदार , रोहिणी रोहणकर इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते. या प्रसंगी प्राचार्य अध्यक्षीय मनोगतात म्हणाले की, महाविद्यालयात शिकवलेले मुल्य शिक्षण आणि संस्कार आयुष्यभर उपयोगी पडतील. प्रमुख अतिथी अनुश्री पाराशर म्हणाल्या की, जे ज्ञान आपल्याला मिळाले आहे त्या ज्ञानाची शिदोरी तुम्हाला तुमच्या जिवनात आयुष्यभर पूरणार आहे. या ज्ञानाच्या शिदोरीवर आपण आपलं जिवन सुंदर आणि विकसित करू शकता. इतर अतिथींनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास प्रामाणिकपणा आणि मेहनतीचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय आठवणी सांगतांना शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. या प्रसंगी विद्यार्थ्यांना पारितोषीकांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करूण गित आणि नृत्य सादर केले. शिक्षकांच्या वतीने विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. बक्षिस वितरण सोहळ्याचे संचालन प्रा. सुवर्णा राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन अनुश्री भारती व रिमझिम भगत या विद्यार्थीनींने केले तर उपस्थितांचे आभार सानिका गावतुरे हिने मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. माधवी पॉल व इतर शिक्षकांचे सहकार्य लाभले. हा निरोप समारंभ यशस्वीपणे संपन्न झाला.

# सांस्कृतिक कार्यक्रमांना प्राधान्य द्यावे; विद्यार्थ्यांना नवी दिशा मिळेल : दिनेश दादापाटील चोखारे


## नूतन कॉन्व्हेन्ट स्कूल, ताडाळी येथे प्रजासत्ताक दिन व देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात साजरा



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.३१ :** शालेय शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले कौशल्य, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित होऊन त्याना जीवनात नवी दिशा मिळते, असे प्रतिपादन काँग्रेस नेते, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तसेच ज्ञान प्रसारक मंडळ, ताडाळीचे संस्थाध्यक्ष दिनेश दादापाटील चोखारे यांनी केले.

नूतन कॉन्व्हेन्ट स्कूल, ताडाळी येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य, भाषणे व विविध सांस्कृतिक सादरीकरणे करून उपस्थितांची मने जिंकली. संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला.दिनांक २६ जानेवारी २०२६, सोमवार रोजी ज्ञान प्रसारक मंडळ, ताडाळी (जि. चंद्रपूर) द्वारा संचालित नूतन कॉन्व्हेन्ट स्कूल, ताडाळी येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थाध्यक्ष दिनेश दादापाटील चोखारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व देशभक्तीपर घोषणांनी शाळा परिसर देशभक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाला. सायंकाळी विद्यार्थ्यांसाठी देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञान प्रसारक मंडळ, ताडाळीचे अध्यक्ष दिनेश दादापाटील चोखारे होते. प्रमुख पाहुणे म्हणून ग्रेस कंपनीचे व्यवस्थापक रतीलालजी अग्रवाल उपस्थित होते. यावेळी माजी ग्रामपंचायत सदस्य सुबोध कासवटे, हेमराज जुनगरे, राजू आमटे तसेच ताडाळी ग्रामचे प्रतिष्ठित नागरिक प्रफुल्ल गोती, अभय चिवंडे, कवडूजी दिवसे आणि नूतन कॉन्व्हेन्ट स्कूलच्या मुख्याध्यापिका अंजली कुरेकार यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली.यावेळी विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना शिल्ड व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त सादर केलेल्या नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थित पालक व मान्यवरांची विशेष दाद मिळवली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका अंजली कुरेकार यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. यामध्ये सहाय्यक शिक्षक सीमा कासवटे, चित्रा वासेकर, धानेश्वरी भगत, सुवर्ण झाडे, लता भरावी, छाया वरती, भाग्यश्री निमकर्डे, प्रगती खांडारकर तसेच अनिता चिवंडे (शिपाई) यांच्यासह सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग लाभला.



**रोषणाई...**
आर्णी: "उजळला दर्गा, दरवळला भक्तीचा सुगंध... बाबा कंबलपोष उर्स शरीफच्या पावन निमित्ताने दर्गा शरीफची ही विलोभनीय, नजरेत भरणारी रोषणाई."
(छायाचित्रसेवा : परवेज बेग)

## संक्षिप्त

### जुन्या वादातून घराची तोडफोड

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ :** जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी एका युवकाने महिलेच्या घरात घुसून तोडफोड केली. ही घटना शहरातील माळीपुरा परिसरातील शिवाजी चौकात ३० जानेवारीला घडली.
मेहेर बेलसरे (३३) रा. चमेडिया नगर यवतमाळ, असे तोडफोड करणाऱ्या युवकाचे नाव आहे. त्याने संगीता अनिल कामठे (४३) यांच्या घराची तोडफोड केली. मेहेर बेलसरे हा ३० जानेवारीला जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी कामठे यांच्या शिवाजी चौकातील घरी आला. यावेळी त्याने कुऱ्हाडीने त्यांच्या घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. तसेच घरातील सामानाची तोडफोड केली. या तोडफोडीत कामठे यांचे ५० हजार रूपयांचे नुकसान झाले आहे. यावेळी त्याने शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. या गंभीर घटनेबाबत संगीता अनिल कामठे यांनी शहर पोलिस ठाणे गाठून तक्रार नोंदविली. त्यावरून पोलिसांनी मेहेर बेलसरे याच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू केला आहे.

### दत्तापूर शिवारातून बैलजोडी चोरली

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ** शेतकरी आधीच विविध संकटांना तोंड देत असताना आता चोरटेही त्यांच्यावर डोळा ठेवून आहेत. घाटंजी तालुक्यातील दत्तापूर शिवारातून अज्ञात चोरट्यांनी २० जानेवारीला बैलजोडी चोरून नेली. त्यामुळे संबंधित शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असून शेतीची कामेच थांबली आहेत. ही बैलजोडी दत्तापूर येथीलच अविनाश भीमराव कोवे (४२) यांच्या मालकीची आहे. त्यांनी काही दिवस बैलजोडीचा शोध घेतल्यानंतर अखेर ३० जानेवारीला या प्रकरणी पारवा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरूद्ध गुन्हा नोंदविला आहे. कोवे गेल्या ६ वर्षांपासून या बैलजोडीला काळजीपूर्वक सांभाळत आहेत. मात्र चोरट्यांनी बैल चोरून नेल्याने आर्थिक नुकसानासोबतच ते भावनिकदृष्ट्याही दुखावले गेले आहेत.

### तिघांना केली अटक

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३१ जानेवारी**
शेंदूरसनी ग्रामपंचायतीमध्ये ऑनलाइन २७ हजार जन्म नोंदी केल्याचा प्रकार पुढे आला. या पाठोपाठ उमरखेड तालुक्यातील भवानी येथेही अशाच प्रकारे बनावट नोंदी केल्याचे आढळून आले. या गुन्हयाच्या तपासासाठी गठित विशेष पथकाने बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि पुणे, मुंबई येथून तब्बल १३ आरोपींना अटक केली. शेवटच्या तीन आरोपींना गुरुवारी २९ जानेवारी रोजी मुंबई येथून ताब्यात घेण्यात आले.

बनावट जन्म नोंदीचा प्रकार पुढे आल्यानंतर एकच खळबळ उडाली. ज्या गावची लोकसंख्या हजार-पंधराशे आहे तेथे २७ हजार नोंदी झाल्या कशा हा प्रश्न पडला. पोलिस तपासात सरकारी वेबसाइट हॅक करून बिहार राज्यातून बनावट जन्म नोंदी केल्याचे आढळले. सायबर टीमच्या मदतीने आयपी अॅड्रेसवरून हॅकरचा ठावठिकाणा शोधून काढत यवतमाळ पोलिसांचे पथक यातील आरोपीपर्यंत पोहोचले.

# आर्णी मार्गावर मृत्यूंची मालिका

## आमदार बाळासाहेब मांगुळकर : अवैध धंद्यांचा सुळसुळाट; कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडू

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३१ जानेवारी**
शहरात आर्णी मार्गावरील सुरू असलेल्या फ्लायओव्हरच्या कामामुळे वारंवार होणारे अपघात आणि त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत असलेला त्रास याबाबत आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी आक्रमक भूमिका घेत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. या मार्गावर आतापर्यंत अपघातांमध्ये तब्बल ९ जणांचा मृत्यू झाला असतानाही नॅशनल हायवे अथॉरिटी आणि जिल्हा नियोजन समिती (DPDC) यांच्याकडून कोणतीही ठोस व प्रभावी पावले उचलली जात नसल्याबद्दल त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. प्रशासनाने तात्काळ उपाययोजना न केल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.शनिवारी विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत आमदार मांगुळकर यांनी विविध गंभीर मुद्द्यांवर सविस्तर भाष्य केले.



आर्णी मार्गावरील उड्डाणपूलाचे रखडलेले व नियोजनशून्य काम, रस्त्यांची वेळेत दुरुस्ती न होणे आणि त्यामुळे होणारे जीवघेणे अपघात याकडे त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले या सर्व मुद्द्यांवर प्रशासनाने तात्काळ व कठोर पावले उचलावीत, अन्यथा जनतेच्या सुरक्षेसाठी संघर्ष करण्यास आपण रस्त्यावर उतरु, असा स्पष्ट इशारा आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी यावेळी दिला. याबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निवेदनामार्फत पाठपुरावा सुरू असूनही दुर्लक्ष केल्या जात आहे. जर आठ दिवसात कोणतीही उपाययोजना केली नाही तर तीव्र आंदोलन करु असा ईशारा पत्रपरिषदेत देण्यात आला.

यावेळी पत्रकार परिषदेला आ. बाळासाहेब मांगुळकर, काँग्रेस पक्षाच्या गटनेत्या वैशाली सवाई, शहर काँग्रेस अध्यक्ष प्रा. डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रविंद्र ढोक, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रमेश भिसनकर, यवतमाळ जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रमोद बगाडे, अरविंद जाधव आदींची उपस्थिती होती.

### पांढरकवडाचे अवैध धंदे यवतमाळात

**यासोबतच पांढरकवडा येथील अवैध व्यावसायिकांनी यवतमाळ शहराला 'सेफ झोन' बनवून आपले वाढते प्रस्थ निर्माण केल्याचा आरोपही त्यांनी केला. वरली मटका, भिंगरीसारखे अवैध धंदे खुलेआम सुरू असून शहरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे बिघडल्यामुळे सिग्नलची पण मागणी केली होती. आठवडी बाजार परिसरात महिला प्रसाधनगृहाजवळ सुरू असलेल्या मटका काउंटरचा व्हिडिओ पत्रकार परिषदेत दाखवून पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.**





# श्री गजानन महाराज प्रगटदिन महोत्सव

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३१ जानेवारी**
श्री गजानन महाराज प्रगटदिन महोत्सवाचे भव्य आयोजन श्री गुरुमाऊली सोसायटी जूना उमरसरा तीन फोटो जवळ येथे करण्यात आले आहे.

तीन फेब्रुवारी २०२६ रोजी मंगळवारी सकाळी ९.३० ते ११.३० च्या दरम्यान श्रींची पालखी मिरवणूक व ग्रंथदिंडी या कार्यक्रमाचे उद्घाटक आमदार बाळासाहेब मांगुळकर राहणार आहेत.

तीन फेब्रुवारी ते सहा फेब्रुवारी ला दररोज दुपारी दोन ते सहा वाजताच्यादरम्यान चार दिवसीय वाणी भूषण श्री मनीषजी महाराज यांच्या रसाळ व भावपूर्ण वाणीतून संगीतमय श्रीकृष्ण अमृतलिला कथा, दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी गुरुवारी दुपारी ११.३० ते १.३०च्या दरम्यान श्री गजानन महाराज ग्रंथाचे पारायण, दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी शनिवारी दुपारी २ ते ६ च्या दरम्यान श्री पुरुषोत्तम पांडे महाराज आणि त्यांचा संच यांचे सुंदरकांड होणार आहे. तसेच शनिवारी रात्री ७ ते १०च्या दरम्यान मुंबई येथील सुप्रसिध्द गायिका श्रृती जैन यांचा भक्तीसंगीताचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन ना. प्रा. डॉ. अशोक उईके, माजी मंत्री मदन येरावार, नगराध्यक्ष अॅड. प्रियदर्शनी उईके हे करणार आहे.

८ फेब्रुवारी २०२६ रोजी रविवारी सकाळी १० ते १२च्या दरम्यान हभप श्री किशोर महाराज कोयते आसेगाव (देवी) यांचे काल्याचे किर्तन व त्यानंतर दुपारी १ ते ४ च्या दरम्यान महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या भक्तीमय कार्यक्रमाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री गुरुमाऊली गजानन महाराज मंदिर उत्सव समिती उमरसरा यांनी केले आहे.

तसेच सदर कार्यक्रमास आर्थिक व अन्नदानाच्या स्वरुपात मदतीचे आवाहन समितीच्यावतीने करण्यात येत आहे.

## नंददीप फाउंडेशनला ब्राझील व बेल्जियमच्या अभ्यासकांची भेट

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३१ जानेवारी**
नंददीप फाउंडेशन बेघर मनोरूग्ण निवारा केंद्राला आज ब्राझील आणि बेल्जियम येथील दोन आंतरराष्ट्रीय अभ्यासकांनी भेट देऊन संस्थेच्या कार्याची पाहणी केली. डायट कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे यांच्या पुढाकाराने ही भेट घडून आली.

या वेळी बेल्जियमचे समाजशास्त्राचे प्राध्यापक डॉ. फ्रेडरिक तसेच ब्राझीलच्या अर्थशास्त्र प्राध्यापिका डॉ. सिंथींया यांनी निवारा केंद्रातील कार्य, उपचारपद्धती, पुनर्वसन प्रक्रिया आणि सेवाव्रतींचे योगदान यांची माहिती घेतली. बेघर मनोरूग्णांच्या पुनर्वसनासाठी सुरू असलेल्या उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले. डॉ. प्रशांत गावंडे यांनी



इंग्रजी भाषेत फाउंडेशनच्या विविध प्रकल्पांची माहिती देत संस्थेची कार्यपद्धती समजावून सांगितली. यानंतर दूरदर्शन जिल्हा प्रतिनिधी आनंद कसंबे यांनी तयार केलेली नंददीप फाउंडेशनवरील माहितीपट पाहून विदेशी पाहुणे भारावून गेले. फाउंडेशनला नुकतेच मिळालेल्या आंतरराष्ट्रीय पुरस्काराबद्दल त्यांनी अभिनंदन व्यक्त केले असून या कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

या प्रसंगी डायटचे माजी प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे, डॉ. सुशील बत्तलवार, फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप शिंदे, नंदिनी शिंदे, संजय बोरगावकर, बबन घोडेस्वार, गौरी बोटरे, निकिता, सविता मडावी, प्रिया बागडे आदी उपस्थित होते.नंददीप फाउंडेशनच्या वतीने या विशेष भेटीबद्दल डॉ. प्रशांत गावंडे यांचे आभार व्यक्त करण्यात आले असून, या पाहुण्यांच्या शब्दांनी सेवाव्रतींना नव्या उत्साहाची प्रेरणा मिळाल्याचे संस्थेच्या प्रतिनिधींनी सांगितले.

## महामार्ग प्राधिकरणाच्या उदासीन धोरणामुळे घेतला पुन्हा दोन युवकांचा बळी

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, महागाव, दि. ३१ जानेवारी**
बायपासचे काम पुर्ण न झाल्याने अरुंद रस्त्यावरून जीवघेणी वाहतुक सुरू असुन त्यामुळे तीन दिवसात तीन बळी गेले आहे. रेती वाहतुक करणाऱ्या भरधाव टिप्परने दुचाकीला धडक दिल्याने दुचाकी टिप्पर मध्ये घुसल्याने एका युवकाचा जागीच मृत्यू झाला तर एक युवक गंभीर जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी नेत असताना वाटेतच मृत्यु झाल्याची घटना आज शनिवार(३१जानेवारी) रोजी दुपारी एक वाजताच्या दरम्यान हिवरा संगम येथे घडली असुन या ठिकाणी अपघाताची मालिका सुरूच असल्याने नागरिकांमध्ये




भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

महागाव तालुक्यातील अंबोडा येथील देवानंद दोडके(वय१९वर्षे) व त्याचा मित्र शुभम पाटे(वय१८वर्षे) हे दोघे आपल्या पल्सर दुचाकीने (क्र. एम एच२९ सीएफ८७९९) माहुर कडे जात असताना हिवरा (संगम) येथील अरूंद असलेल्या डांबरी रस्त्यावरून समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या रेती वाहतुक करणाऱ्या टिप्पर क्र. एम एच.४०बी. एल९५४४ ने दुचाकीला धडक दिली यात दुचाकी टिप्पर मध्ये घुसुन मागील बाजुस अडकली त्यामुळे टिप्पर पलटी होऊन घासत जाऊन रस्त्यालगत असलेल्या नालीत गेला.यात दुचाकीवरील देवानंद हा टायर खाली अडकुन चेंदामेंदा झाला तर शुभम हा गंभीर जखमी झाला.तर दुचाकीचा अक्षरशः चुराडा झाला हा अपघात घडल्याबरोबर बाजुला असलेल्या दुकानातील आशिष हातमोडे,संदीप बुळे व इतर युवकांनी धाव घेत टिपरच्या समोरील भागात अडकलेल्या जखमी शुभमला बाहेर काढून त्याला उपचारासाठी माहुर येथील शासकीय रुग्णालयात हलविले परंतु शुभम ची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे हलविण्यात आले होते परंतु यवतमाळ पोहोचण्यापूर्वीच त्याचा वाटेतच मृत्यू झाल्याची माहिती आहे.या अपघातामुळे काही काळ वाहतूक खोळंबली होती

## पोलिसांकडून 'दंगा काबू' योजनेचे यशस्वी प्रात्यक्षिक

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी ढाणकी, दि. ३१ जानेवारी**
आगामी सण-उत्सव आणि सार्वजनिक शांततेच्या पार्श्वभूमीवर, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी बिटरगाव पोलीस ठाण्याच्या वतीने 'दंगा काबू' (Riot Control) योजनेचे थरारक प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. अचानक उद्भवणाऱ्या हिंसक परिस्थितीवर कशा प्रकारे नियंत्रण मिळवायचे, याचे प्रशिक्षण आणि सराव या मोहिमेद्वारे पोलिसांना देण्यात आला.

**नेमके प्रात्यक्षिक काय होते?**
यावेळी पोलीस ठाण्याच्या परिसरात एका काल्पनिक दंगलीचे दृश्य उभे करण्यात आले होते. जमाव हिंसक झाल्यास सुरुवातीला केली जाणारी घोषणाबाजी,



त्यानंतरचा सौम्य लाठीचार्ज आणि तरीही जमाव पांगला नाही तर अश्रूधुराच्या नळकांड्यांचा वापर कसा करायचा, याचे प्रत्यक्ष सादरीकरण करण्यात आले.

**प्रमुख मुद्दे:**
* शिस्तबद्ध कार्यवाही: जमावाला पांगवताना कमीत कमी बळाचा वापर करून परिस्थिती कशी हाताळायची, याचे दर्शन घडले.
* साधनांची तपासणी: दंगल नियंत्रण पथकाकडे असलेली ढाली, हेल्मेट, लाठी आणि अश्रूधुराच्या गनची कार्यक्षमता तपासण्यात आली.
* वेळेचे नियोजन: घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक किती वेळात घटनास्थळी पोहोचते आणि 'पोझिशन' घेते, याची चाचणी घेण्यात आली.


या प्रात्यक्षिकामुळे बिटरगाव पोलीस दलाची सतर्कता दिसून आली असून, स्थानिक नागरिकांनीही पोलिसांच्या या तयारीचे कौतुक केले आहे.

**"नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस दल सदैव तत्पर आहे. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी. कायदा हातात घेणाऱ्यांविरुद्ध पोलीस कठोर कारवाई करण्यास सज्ज आहेत, हेच या प्रात्यक्षिकातून स्पष्ट करण्यात आले आहे."**
**— पांडुरंग शिंदे ठाणेदार, पोलीस स्टेशन बिटरगाव**

## हिरा देशमुखची आंतरराष्ट्रीय युवा शिखर संमेलनासाठी निवड

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३१ जानेवारी**
येथील यवतमाळ पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी हिरा राखी देशमुख हिची व्हिएतनाम येथे होणाऱ्या सातव्या आंतरराष्ट्रीय युवा शिखर संमेलनासाठी निवड झाली आहे. या जागतिक मंचावर ती भारताचे प्रतिनिधित्व करणार असून, उद्या शनिवारी ३१ जानेवारी रोजी ती व्हिएतनाममधील 'हो ची मिन्ह' शहराकडे रवाना होत आहे.

या संमेलनासाठी देशभरातून अनेक तरुणांचे अर्ज आले होते. अत्यंत कठीण मुलाखत प्रक्रिया, नेतृत्व क्षमता आणि युवकांना प्रेरित करण्याची कौशल्ये या निकषांवर हिराची निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या संमेलनाचा संपूर्ण खर्च आयोजकांकडून केला जाणार आहे. हिरा देशमुख सध्या वायपीएस शाळेत अकरावी



विज्ञान शाखेत शिकत आहे. ती बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची धनी असून, अवघ्या १६ वर्षांच्या हिराच्या नावावर अनेक पुरस्कार आहेत. तिला रनिंगमध्ये सात, निबंध स्पर्धेत दोन सुवर्ण पदक मिळाले आहेत. कविता, वादविवाद स्पर्धा, उत्कृष्ट संचालनासाठीही अनेक पुरस्कार तिला मिळाले आहेत. नागपूर येथील एमयूएनबीमध्ये तिला 'बेस्ट व्हर्बल मेंशन' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तिने अनेक व्यवसायिक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन केले आहे. हिरा धनुर्विद्येत पारंगत असून तिला लहानपणापासूनच वाचनाची प्रचंड आवड आहे. या आवडीमुळे ती विद्यार्थ्यांमध्ये समन्वयक म्हणूनही काम करते.

झरी-जामणी येथील राजीव गांधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. राखी देशमुख यांची ती कन्या आहे. त्यांच्या राजराजेश्वरी बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्यातही हिराचा सहभाग असतो. हिराच्या या यशामुळे यवतमाळच्या शैक्षणिक वैभवात मानाचा तुरा रोवला गेला आहे. ग्रामीण भागातील मुली जागतिक स्तरावर नेतृत्व करू शकतात, हे हिराने आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले. हिराच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी विराआंसचे 22 फेब्रुवारीला नागपूर येथे लाँगमार्च व मेळावा

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३१ जानेवारी**
स्वतंत्र विदर्भ राज्य मिळविण्याकरिता २०२७ ची डेड लाईन घेऊन विदर्भ राज्य समिती सातत्याने प्रयत्न करीत आहे. विदर्भाची मागणी विदर्भाच्या कानाकोप-या पर्यंत पोहचविण्याकरिता व जनसामान्याच्या मनात विदर्भाची चळवळ रुजली पाहिजे, या हेतुने विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने २०२५ च्या अखेरपर्यंत सहा जनसंकल्प मेळावे घेतले गेले. त्यात मेळघाट मारख्या अतिदुर्गम भागाचा समावेश होता, विराआंस ने आयोजित केलेल्या कारंजा लाड, मेळघाट, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व अमरावती (बडनेरा) जनतेचा सहभाग वाखाण्याजोगा होता.



महाराष्ट्र राज्य दिवाळखोरीच्या उबंरठ्यावर असुन राज्याचे महसुली उत्पन्न ५ लाख ६० हजार ९६३ कोटी रुपये आहे आणि राज्य सरकारला वर्षाच्या खर्यां गीता ६ लाख ६ हजार ८५५ कोटी रूपये लागणार असून राज्याच्या अर्थसंकल्प (बजेट) ४५ हजार कोटी रुपये तुटीचा आहे. याशिवाय राज्यावर ३१ मार्च २०२५ रोजी ७ लाख ३२ हजार कोटींचा कर्जाचा डोंगर असून त्यावर द्यावे लागणारे व्याज हे ५६ हजार ७२७ कोटी रुपये आहे. राज्य सरकारने बजेट मंजूर झाल्या नंतर जुन २०२५ मध्ये १३ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेतले असून परत १ लाख ३२ हजार कोटी रुपयाचे कर्ज घेण्यास केंद्र सरकारला परवानगी मागीतली आहे. त्यापैकी फक्त ५३ हजार कोटी रुपये कर्ज घेणे बाकी राहीले आहे. आज कर्जाचा डोंगर ९ लाख ३० हजार कोटींवर गेला असून घेणे असलेले ५३ हजार कोटी रुपये कर्ज प्रत्यक्ष घेतल्यानंतर राज्यावरील कर्जाचा डोंगर व व्याजाचा मार (बोझा) एकूण ९ लाख ८३ हजार ७२७ कोटी रुपये होणार आहे.

याशिवाय राज्य सरकारला १० महिन्यापुर्वी कामे केलेल्या सावं. बां. विभागाच्या कंत्राटदाराचे ४० हजार कोटी, जलसंधारण व जलसिंचनाच्या कंत्राटदारांचे १३ हजार कोटी, जलजीवन मिशनच्या कंत्राटदारांचे १२ हजार कोटी रुपये, ग्रामविकास विभागाच्या विशेष सोई व सुधारणा केलेल्या कंत्राटदारांचे १८ हजार कोटी रुपये, नगरविकास खात्याच्या कंत्राटदारांचे ४ हजार कोटी रु., ग्रामीण भागातील विशेष सुधारणा व केलेल्या बांधकामाचे कंत्राटदारांचे ६ हजार कोटी रुपये व जिल्हा विकास निधींच्या (डी. पी. सी.) कामाच्या कंत्राटदारांचे २ हजार ५१६ कोटी रुपये, असे एकुण देणे असलेल्या रकमेची राशी ९५ हजार ७३२ हजार कोटी रुपये आहे. या कर्जाच्या व लायबिलिटीजच्या बोझाखाली राज्यसरकार पूर्णता दबले असून विदर्भाचा नागपूर कराराप्रमाणेचा सिंचनाचा अनुशेषाचा ६० हजार कोटीचा व इतर क्षेत्राचा १५ हजार कोटीचा अनुशेष कदापी भरुन काढू शकत नाही. त्यामुळे विदर्भातील धरणे व कालये बांधून १४ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणू शकत नाही. त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबु शकत नाही, नक्षलवादाला आळा बसू शकत नाही, कुपोषणामुळे होणारे बालमृत्यु, गर्भारमाता मृत्यु, स्तनदामाता सता थांबवु शकत नाही, बेरोजगाराचा दिवसेंदिवस वाढत चाललेला अनुशेष रोजगाराच्या संधीअभावी थांबवू शकत नाही, १०० वर्ष विदर्भ महाराष्ट्रात राहीला तरी हे जटील प्रश्न सुटू शकत नाही. म्हणून "विदर्भाचे स्वतंत्र राज्य" हेच या प्रश्नाचे एकमेव उत्तर आहे. मिशन २०२७ "स्वतंत्र विदर्भ राज्य" डोळ्यासमोर ठेवन विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने

२ वाजता " विदर्भ निर्माण जनसंकल्प लाँगमार्च " ची सुरुवात रविवार दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२२ नागपुरातील विदर्भ चंडिका मंदिर, शहिद चौक, इतवारी येथन होणार असून व तो टांगा स्टॅन्ड चौक, नंगा पुतळा चौक, डागा चौक, अग्रसेन चौक ते रूईकर चौक पर्यंत जाणार असून दुपारी २ वाजता चिटणीस पार्क येथे भव्य जाहिर मेळावा होणार आहे. या " विदर्भनिर्माण जनसंकल्प लाँगमार्च व मेळाव्यामध्ये " ११ ही जिल्हयातील १२० तालुक्यांचे प्रतिनीधी, पदाधिकारी व विदर्भवादी पाच हजार पेक्षा अधिक नागरिक, तरूण व महिला हजर राहणार आहेत. या आंदोलनात सर्वासामान्य जनतेने आपल्या हक्काकरीता मोठ्या संख्याने सहभागी होऊन कार्यकम यशस्वी करावा, असे आवाहन विदर्भ राज्य आंदोलन समितीने केले आहे.



## सेवानिवृत्त झाल्याबद्दल विजय महाकुलकर यांचा सन्मान

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. ३१ जानेवारी**
नगर परिषदेचे प्रशासन अधिकारी विजय महाकुलकर हे ३१ जानेवारी ला सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा मानवी हक्क सुरक्षा परिषद तर्फे सन्मान करण्यात आला. आपल्या प्रदीर्घ, प्रामाणिक व कर्तव्यदक्ष सेवेसाठी त्यांचा यथोचित गौरव करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मानवी हक्क सुरक्षा परिषदेचे राज्याध्यक्ष तथा पत्रकार राजु धावंजेवार, परशुराम पोटे, ज्ञानेश्वर बोनगीनवार, महादेव दोडके, संजय चिंचोलकर उपस्थित होते.

युवाराष्ट्र दर्शन
गोंदिया जिल्हा
रविवार, १ फेब्रुवारी २०२६

**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**
मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६

**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**
जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

# दरेकसा ग्रामपंचायत अंतर्गत दलदलकुही येथील पाणीपुरवठा आठ महिन्यापासून बंद

## जलजीवन मिशन योजनेचा बट्याबोळ
## पैसा खर्च करूनही जनता पिण्याच्या पाण्यापासून वंचित

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**सालेकसा :** महाराष्ट्र शासनाने जल जीवन मिशन ही योजना मागील दोन वर्षांपूर्वी अमलात आणली व यासाठी शासन प्रशासन व जिल्हा परिषद अंतर्गत जलजीवन मिशन अभियान अंतर्गत संपूर्ण जिल्ह्यामध्ये प्रत्येकाच्या घरी नळ फक्त कागदावर दाखवून कंत्राटदार व काही अधिकारी यांच्या संगणमताने काही दिवसापूर्वी लाखो रुपयांचे बिल सुद्धा काढण्यात आले आहे परंतु बऱ्याच तालुक्यात गावात आजही पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत ही बाब अतिशय निंदनीय म्हणावा लागेल प्राप्त माहितीनुसार सालेकसा तालुक्यातील दरेकसा ग्रामपंचायत मार्फत आदिवासी क्षेत्रात






असलेली अतिदुर्गम भागात गाव म्हणून ओळख असणारे दलदलकुही या गावी गेल्या आठ महिन्या पूर्वीपासून जलजीवन मिशन योजना बंद असल्यामुळे नागरिक

**आदिवासीच्या नावावर मते मागणारे नेते गेले कुठे, असा सवाल ही मतदाराकडून येऊ लागला आहे व अति दुर्गम भागात सर्वाधिक महाराष्ट्र मध्ये शेवटच्या टोकावर तसेच छत्तीसगड मध्यप्रदेश सीमेलगत असलेला हा एकमेव तालुका व गाव आहे मात्र आजही विकासापासून वंचित असून निवडणुका आले की नेते मोठे मोठे आश्वासन देऊन निघून जातात निवडणुका संपले की पुन्हा विसरून जातात अशी अवस्था या भागातील समस्या आहेत व रोड रस्ते नाली पाणी सिंचन आरोग्य पथदिवे कचरापेटी तसेच मूलभूत सुविधा सुद्धा आजही समस्या आहेत.**

पिण्याचे पाण्यापासून वंचित आहेत फक्त ही योजना कागदावर दाखवून शासनाच्या पैशाची शासनाचेच कर्मचारी व कंत्राटदार यांनी डल्ला मारलेला आहे काही दोन दिवसानंतर याच भागात म्हणजे कचारगड महाकाली कंकाली देवस्थान आहे व या देवस्थानच्या दर्शनाकरिता लाखो भाविक येथे दरवर्षी येतात व प्रत्येकांच्या घरी या क्षेत्रात आदिवासी बांधवासह इतर मित्र मंडळी नेहमीच पाहुणे रात्रीच्या मुक्कामासाठी येत असतात त्यामुळे पाणीच नाही तर मग आम्ही कुठे मुक्काम करावा हा संतप्त सवाल ही नातेवाईकाकडून येऊ लागला आहे दरेकसा ग्रामपंचायत अंतर्गत १५.वा वित्त आयोग अंतर्गत इतरही फंड मोठ्या प्रमाणावर आहेत परंतु पैसा कुठे मरतो हा सुद्धा अजूनही गुलदस्त्यात म्हणावा लागेल सदर कोई येथील नड योजना कायमस्वरूपी सुरू करण्यात यावी अशी मागणीही सुद्धा दलदलकुही येथील स्थानिक रहिवासी व दरेकसा येथील माजी उपसरपंच दिनेश मडावी यांच्यासह इतर ग्रामस्थांनी सुद्धा केली आहे.

# आमगाव येथे माजी खा. डॉ. अशोक नेते यांची ज्येष्ठ नेत्यांना सदिच्छा भेट



## विविध विषयांवर सखोल चर्चा

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**आमगाव :** माजी खासदार तथा भारतीय जनता पार्टी अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री मान. डॉ. अशोकजी नेते यांनी आज दौऱ्यानिमित्त आमगाव येथे माजी आमदार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व ज्येष्ठ नेते केशवराव मानकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी सामाजिक, राजकीय व विकासात्मक विषयांवर सविस्तर व सकारात्मक चर्चा करण्यात आली.

तसेच आमगाव येथील ज्येष्ठ नेते घनश्यामजी अग्रवाल यांच्या निवासस्थानीही मा.खा. डॉ. अशोकजी नेते यांनी सदिच्छा भेट देऊन आपुलकीने संवाद साधला. याप्रसंगी जिल्हा सचिव नरेंद्र वाजपेयी, ज्येष्ठ नेते मुनाभाऊ बिसेन, कैलास तिवारी, जिल्हा उपाध्यक्ष अरुण हरडे, शहर अध्यक्ष मनोज सोमवंशी, राऊत ठेकेदार, युवा नेते हितेश डोंगरे तसेच भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैद्यकीय संघटनेची दादांना श्रद्धांजली



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**अर्जुनी मोरगाव :** तालुका वैद्यकीय संघटना अर्जुनी मोरगाव च्या वतीने महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.दादांचा राज्यासह केंद्रिय राजकारणात महत्वाचा वाटा होता. त्यांच्या अकाली जाण्याने राष्ट्राची हानी झाली. ही हानी भरून निघणे अशक्य असल्याचा सूर या श्रद्धांजली कार्यक्रमात उमटला.याप्रसंगी संघटनेतील डॉ उल्हास गाडेगोने, डॉ रमेश कापगते, डॉ नरेंद्र भांडारकर, डॉ दीपक रहेले, डॉ.वैशाली गाडेगोने, डॉ.मनीषा झोडे, डॉ.सुनीता कापगते, डॉ.प्रीती मंडल, डॉ महेश नाकाडे, डॉ.सुधा रहेले, डॉ. कुमुद गायकवाड उपस्थित होते.

# दुचाकीची उभ्या ट्रॅक्टला धडक; महिलेचा घटनास्थळीच मृत्यू



**अर्जुनी मोरगाव :** तालुक्यातील इटखेडा इसापूर मार्गाची सुरुवातीला असलेल्या वळणारवर उभ्या ट्रॅक्टरला दुचाकी चालक महिलेने जब्बर धडक दिली. या धडकेत महिलेचा जागीच मृत्यू झाला. ही घटना ३० जानेवारीची असून रेवती किशोर मस्के रा. कोरेगाव ता. देसाईगंज जि.गडचिरोली असे मृत महिलेचे नाव आहे.

मृतक महिला रेवती किशोर मस्के हिचे मुळगाव कोरेगाव येथील असून त्यांचे पती आपल्या स्वगाव कोरेगाव येथे मेडिकल चालवतात त्यांची दोन्ही मुले अर्जुनी मोर येतील सरस्वती विद्यालयात शिक्षण घेत असल्यामुळे रेवती ही मुलांसोबत अर्जुनी मोर येथे राहत होती. पती बाहेरगावी गेल्यामुळे दिवसभर कोरेगाव येथील मेडिकल रेवती हिने चालविले व सायंकाळी अर्जुनी मोर. मार्गे आपल्या मुलांकडे राहायला जात असताना उभ्या ट्रॅक्टरला त्यांची दुचाकी धडकली. या घटनेत रेवतीचा जागीच मृत्यू झाला. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

# ७ बाईकसह ४ लाखाचा मुद्देमाल जप्त



**गोंदिया :** जिल्ह्यात चोरीचे प्रमाण वाढले आहेत. अशातच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दुचाकी चोरीचे ७ गुन्हे उघडकरून आरोपींकडून ७ दुचाकी एकूण ४ लाख ५० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. कारवाई ३० जानेवारी रोजी करण्यात आली.

सविस्तर असे की, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गस्तीवर असतांना गुप्त माहितीच्या आधारावर धीरज भूषण फुंडे (३५) रा. कालीमाटी व त्याचे मित्र जयराम धर्मराज सेवईवर (४७) रा. बालमटोला / दासगाव, तेजराम उर्फ तेजस जगदीश आडे (३०) रा. कोंढा कोसारा जि भंडारा, योगेंद्र मुरतलाल नागपुरे (४२) रा. सोनबिहारी यांनी मिळून गोंदिया जिल्यातील व राजनांदगाव छत्तीसगड येथून मोटार सायकल चोरी करून योगेंद्र मुरतलाल नागपुरे यांचे कडे विक्री करण्याचे इराद्याने ठेवले आहेत. पथकाने सापळा रचून धीरज फुंडे, जयराम सेवईवर, योगेंद्र नागपुरे यांना ताब्यात घेऊन मोटार सायकल चोरी संबंधाने विचारपूस केली असता त्यांनी घटनेची कबुली दिली. तसेच १९ जानेवारी रोजी सालेकसा १ मोटर सायकल चोरी केल्याचे सांगितले तसेच गोंदिया जिल्ह्यात मौजा कामठा, बिरसोला, रेलटोली गोंदिया, आमगाव, गहिरीभेंडा जि. राजनांदगाव येथून मोटार सायकल चोरी केल्याचे कबूल केले. त्या आधारावर आरोपींकडून एकूण ७ दुचाकी जप्त करण्यात आल्या. याची एकूण किंमती ४ लाख ५० हजार ऐवढी आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनात स्थागुशाचे पोनि. पुरुषोत्तम अहेरकर यांच्या नेतृत्वात पोहवा विठ्ठल ठाकरे, सुबोध बिसेन, इंद्रजित बिसेन, संजय चौहान, दीक्षितकुमार दमाहे, भोजराज बहेकार, रियाज शेख, राजकुमार खोटेले, भुवनलाल देशमुख, पो. शि. छगन विठ्ठले, हंसराज भांडारकर, दुर्गेश पाटील, चापोशि कुंभलवार, राम खंदारे आदींनी पार पाडली.

# त्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करा

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**सालेकसा :** पोलिस ठाण्यांतर्गत मकाटोला/कोटरा पुजारीटोला धरणात एका युवतीचा मृतदेह आढळला. मृतक मुलगी मागील काही दिवसांपासून बेपत्ता होती. कल्पना तेजराम भोयर (२३) रा. हरदोली ता. देवरी असे मृत मुलीचे नाव आहे. मात्र महिना लोटूनही कल्पनाची हत्या की आत्महत्या यावर सस्पेंश कायम आहे.

तालुक्यातील पुजारीटोला धरणात २३ डिसेंबर २०२५ पासून बेपत्ता असलेल्या कल्पनाचा मृतदेह आढळला. घरातून बेपत्ता झाल्यानंतर घरच्या मंडळींनी गावासह नातेवाईकाकडे शोध घेतला परंतु ती कुठेच सापडली नाही. याची तक्रार फिर्यादी वडिल तेजराम भोयर यांनी २४ डिसेंबर रोजी पोलिसात तक्रार दाखल केली. मात्र ती तक्रार



पोलिसांनी घेतली नाही. त्यातच कल्पनाचा मृतदेह २८ डिसेंबर रोजी धरणात आढळला. आज महिना लोटला तरी कल्पनाची हत्या की आत्महत्या हा बिंग अद्याप फुटले नाही. विशेष म्हणजे पोलिसांनी तंटामुक्त समितीच्या व पोलीस जमादार यांच्या समक्ष मौकास्थळी पंचनामा करून ग्रामीण रुग्णालय येथे उत्तरीय तपासणी करण्यात आली. मात्र हत्या की आत्महत्या याची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी वडिल तेजराम भोयर यांनी केली आहे.

# मोरवाही येथे दुकान व गोठ्याला आग




युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** तालुक्यातील मोरवाही येथील अशोक चैतराम ब्राह्मणकर या शेतकऱ्याच्या दुकान व गुरांच्या गोठ्याला शुक्रवारी (ता-३०) दुपारी अचानक आग लागली. यात जवळपास तिन लक्ष रुपयांचे नुकसान झाले असल्याचे बोलले जात आहे.

रब्बी धान पिकाची लागवड सुरू असल्याने घरातील सर्व मंडळी शेतात गेली होती. अश्यात शुक्रवारी दुपारी अकरा वाजता च्या सुमारास गोठ्याला आग लागली. गावकऱ्यांनी तत्काळ मदत पोहचवित आगीवर नियंत्रण केले.यात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी सदर शेतकऱ्याचे मनेरी दुकानाचे व गोठ्याचे असे मिळून जवळपास तिन लक्ष रुपयांचे नुकसान झाले असल्याचे बोलले जात आहे. आगीचे कारण मात्र कळू शकले नाही.घटनास्थळाला स्थानिक तलाठी तसेच ग्रामीण पोलिसांनी भेट देऊन पंचनामा केला आहे.

# इसमाचा आकस्मिक मृत्यू

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**गोंदिया :** आमगाव पोलिस ठाण्यातंर्गत शिवमंदिर परिसरात एक इसम बेशुध्द अवस्थेत पडून होता. त्याला रूग्णालयात हलविले असता त्याचा मृत्यू झाला. ही घटना २९ जानेवारीची आहे. धनिराम काशिराम भांडारकर (४५) रा.बनगाव असे मृताचे नाव आहे. मृतक धनिराम भांडारकर हा देवरी रोडवर असलेल्या शिवमंदिरात बेशुध्द अवस्थेत आढहला. मंदिरात सफाईचे काम करणाऱ्याने याची सुचना पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून बेशुध्द असलेल्या धनिराम याला ग्रामीण रूग्णालयात हलविले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी आमगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास पोना भजने करीत आहेत.

# कचारगड देवस्थान समिती यापूर्वीही विवादित, देवाभाऊ आदिवासी विकास पर्व' या नावाचा वापर

## कचारगड यात्रा : आदिवासी अस्मितेचा, श्रद्धेचा आणि पूर्वजांच्या स्मृतींचा महाकुंभ

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**सालेकसा :** गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातील कोसमतरा–धनेगाव ग्रामपंचायत अंतर्गत असलेली कचारगड ही भूमी केवळ एक धार्मिक स्थळ नसून, ती संपूर्ण देशभरातील आदिवासी समाजाच्या उत्पत्तीची, अस्मितेची व संस्कृतीची पवित्र ओळख मानली जाते. दरवर्षी माघ पौर्णिमेच्या दिवशी येथे भरविण्यात येणारी माँ काली–कंकाली–पारिकुपार लिंगो कचारगड यात्रा ही आज 'आदिवासी महाकुंभ' म्हणून देशभर ओळखली जाते.

या यात्रेनिमित्त महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांतून लाखो आदिवासी बांधव कचारगड येथे उपस्थित राहून आपल्या पूर्वजांना अभिवादन, तसेच माँ काली–कंकाली–पारी कुपारलिंगो देवस्थानाचे दर्शन घेतात. श्रद्धा, परंपरा, निसर्गपूजन आणि सामूहिक एकतेचे हे प्रतीक असलेली यात्रा आदिवासी समाजासाठी भावनिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्त्व राखून आहे. सन १९८६ मध्ये प्रथमच कचारगड येथे या यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ही जत्रा एक दिवसाची होती. मात्र वर्षागणिक भाविकांची वाढती संख्या, देशभरातून येणारा प्रतिसाद आणि यात्रेचे वाढते महत्त्व लक्षात घेता आज ही यात्रा पाच दिवसांची झाली आहे. स्थानिक नागरिक व आदिवासी बांधवांच्या मते, भविष्यात भाविकांची वाढती गर्दी पाहता ही यात्रा नऊ दिवसांपर्यंत चालण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. असे असताना, यावर्षी यात्रेसंदर्भात लावण्यात आलेल्या मोठमोठ्या बॅनरवर 'देवा भाऊ आदिवासी विकास कचारगड यात्रा' असे नाव आढळून



## प्रकरणाला आणखी एक नवा वादग्रस्त ट्विस्ट

आल्याने आदिवासी समाजात संवेदनशील भावना व संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. परंपरेने आणि इतिहासाने ओळखल्या जाणाऱ्या यात्रेच्या मूळ नावात बदल किंवा राजकीय, वैयक्तिक नावांचा समावेश झाल्याने अनेक आदिवासी बांधवांनी नाराजी व चिंता व्यक्त केली आहे.

याआधीही कचारगड देवस्थान समिती विविध कारणांमुळे विवादाच्या भोवऱ्यात सापडलेली आहे. त्यातच यात्रेच्या नावावरून पुन्हा एकदा वाद निर्माण झाल्याने, ही बाब केवळ नावापुरती मर्यादित नसून ती आदिवासी अस्मिता, परंपरा व श्रद्धेशी जोडलेली असल्याचे मत समाजातून व्यक्त होत आहे.

कचारगड ही जागा कोणत्याही एका व्यक्तीची किंवा संस्थेची नसून, ती संपूर्ण आदिवासी समाजाची सामूहिक वारसा स्थळ आहे. त्यामुळे या यात्रेच्या नावात, स्वरूपात किंवा व्यवस्थापनात कोणताही बदल करताना सर्व आदिवासी संघटना, समाज बांधव, ज्येष्ठ नागरिक व स्थानिक ग्रामसभा यांचा विश्वासात घेणे आवश्यक असल्याची भावना तीव्र होत आहे. या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने या संपूर्ण प्रकरणाची संवेदनशीलतेने दखल घ्यावी, यात्रेचे ऐतिहासिक नाव, परंपरा व धार्मिक स्वरूप अबाधित राहील याची खात्री करावी, तसेच कोणत्याही प्रकारचा सामाजिक तणाव निर्माण होणार नाही यासाठी तटस्थ व समन्वयाची भूमिका घ्यावी, अशी मागणी होत आहे. कचारगड यात्रा ही केवळ एक जत्रा नसून, ती आदिवासी समाजाच्या अस्तित्वाची, इतिहासाची व एकतेची ओळख आहे. त्यामुळे या पवित्र यात्रेचा सन्मान राखणे ही प्रशासन, आयोजक व समाजातील प्रत्येक घटकाची सामूहिक जबाबदारी असल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

सन २०१८ मध्ये देवा भाऊ व मा. नितीनजी गडकरी यांनी कचारगड यात्रेला भेट दिली होती. मात्र गोंडी भाषा येत नसल्यामुळे त्यांना मंचावर स्थान देण्यात आले नव्हते, केवळ स्क्रीनवर व्हिडिओ दाखवण्यात आले होते. त्या वेळीही याला विरोध झाला होता. कचारगड यात्रा ही आदिवासी श्रद्धा व परंपरेशी जोडलेली असून, बॅनरद्वारे कार्यक्रमाला वेगळे वळण देणे योग्य नाही. 'देवा भाऊ आदिवासी विकास कचारगड यात्रा' या नावाच्या बॅनरचा आम्ही निषेध करतो.

**– नामदेव आंचले, सदस्य**

'मी सालेकसा कडे येताना रस्त्यांवर अशा प्रकारचे बॅनर पाहिले. हे अत्यंत लज्जास्पद असून आदिवासी समाजाच्या भावना दुखावणारे आहे. कचारगड यात्रेसारख्या पवित्र व परंपरागत कार्यक्रमाशी असे नाव जोडणे योग्य नाही, अशी त्यांनी स्पष्ट नाराजी व्यक्त केली.

**– लीना उईके, सदस्य**

माँ.काली–कंकाली–कुपारलिंगो या नावाने कचारगड यात्रा अनेक वर्षापासून सुरू आहे. या पवित्र यात्रेचे पारंपरिक नाव बदलून 'देवा भाऊ आदिवासी पर्व' असे बॅनर लावणे अत्यंत दुर्दैवी व अयोग्य आहे. अशा प्रकारचे कृत्य आदिवासी समाजाच्या परंपरा व श्रद्धेचा अपमान करणारे असून, ते लज्जास्पद असल्याचे' त्यांनी स्पष्ट मत व्यक्त केले. कचारगड देवस्थान समिती यापूर्वीही विविध समस्या व आरोपांमुळे चर्चेत राहिली आहे. अशा परिस्थितीत, यात्रेच्या पारंपरिक ओळखीपासून दूर जाऊन 'देवा भाऊ आदिवासी विकास पर्व' या नावाचा वापर करण्यात आल्याने प्रकरणाला आणखी एक नवा वादग्रस्त ट्विस्ट मिळाल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

**– शंकर मडावी, (आदिवासी सेवक)**

# ३१ जानेवारी क्रांतीचा, जागृतीचा आणि स्वाभिमानाचा दिवस : आ. बडोले

**सडक अर्जुनी :** ३१ जानेवारी हा दिवस फक्त एक तारीख नाही, तर तो एक क्रांतीचा, जागृतीचा आणि स्वाभिमानाचा दिवस आहे. भारतरत्न परम पूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२० मध्ये जेव्हा मूकनायक हे पाक्षिक सुरू केले, तेव्हा ते केवळ कागदावरचे शब्द नव्हते तर ते शोषितांच्या गळ्यातील आवाज, दडपलेल्या समाजाच्या हृदयातील विद्रोह आणि अस्पृश्यांच्या अधिकारांसाठी लढणारी पहिली लेखणी होती.असे उदगार माजी सामाजीक न्यायमंत्री तथा आमदार ईंजी.राजकुमार बडोले यांनी व्यक्त केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम सुरु केलेल्या 'मुकनायक' या वृत्तपत्राच्या वर्धापनदिनी आमदार ईंजी.राजकुमार बडोले यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक पाठबळाने सुरू झालेल्या या वृत्तपत्राने दलित-बहुजन समाजाला शिक्षण, संघटना आणि संघर्षाची शक्ती दिली. बाबासाहेबांनी स्वतः 'मनोगत' सारखे अग्रलेख लिहून,



सामाजिक अन्यायावर, नागरिकत्वाच्या हक्कांवर आणि स्वराज्याच्या खऱ्या अर्थावर प्रकाश टाकला. हे पत्र म्हणजे फक्त बातम्या नव्हत्या, तर एक चळवळ होती. जी आजही 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या त्रिसूत्रीला जिवंत ठेवते. आजच्या या वर्धापन दिनी आपण सर्वजण बाबासाहेबांच्या दूरदृष्टीला वंदन करूया. आजच्या माध्यमांच्या युगातही मूकनायकासारखा निष्पक्ष, निर्भीड आणि न्यायासाठी लढणारा आवाज कायम राहावा, यासाठी प्रयत्न करूया. ज्या मुक्यांना नायक बनवण्यासाठी बाबासाहेबांनी हे पत्र सुरू केले, त्या सर्वांना आजही त्याच प्रेरणेने पुढे जाण्याची शक्ती मिळो.असे मनोगत आमदार राजकुमार बडोले यांनी व्यक्त केले.

# उपचारदरम्यान इसमाचा मृत्यू

**गोंदिया :** गोरेगाव पोलिस ठाण्यातंर्गत मुरदोली येथे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या इसमाचा उपचारदरम्यान मृत्यू झाला. ही घटना २४ जानेवारीची आहे. भाऊराव दामा मरस्कोल्हे (४२) रा.मुरदोली असे मृतकाचे नाव आहे. मुरदोली येथील भाऊराव दामा मरस्कोल्हे याने स्वत:चा गळा व हाताच्या धमन्या कापून आत्महत्येचा प्रयत्न केला. दरम्यान जखमी झालेल्या भाऊराव याला उपचाराकरीता जिल्हा सामान्य रूग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्यावर उपचार सुरू असताना २४ जानेवारी रोजी त्याचा मृत्यू झाला.

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा
जिल्हा
रविवार दि.०१ फेब्रुवारी २०२६

## किडनीच्या उपचाराकरीता दि भंडारा महिला नागरी पतसंस्थेची आर्थिक मदत

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** तालुक्यातील झबाडा (मानेगाव) येथील १५ वर्षीय प्रभात भगवान जाधव हा मुलगा दोन्ही किडनीच्या रोगाने त्रस्त आहे. आपल्या तुटक्याफाटक्या झोपडीत हलाखीच्या परिस्थितीत त्यांचे आई_वडील मजुरी करून कसे बसे आपले जीवन जगत आहेत.

प्रभात मानेगाव येथे १० व्या वर्गात शिकत आहे,पण किडनीच्या आजारापायी त्याला चालता येत नसल्यामुळे त्यांचे वडील त्यास शाळेत सोडायला जात असतात. प्रभात च्या औषधोपचारा करिता पैशांची खूप गरज आहे. प्रभात च्या मदतीकरिता सामाजिक कार्यकर्ता मो सईद शेख यांनी दि भंडारा महिला नागरी सहकारी पत संस्थेच्या अध्यक्षा सौ.दुगार्ताई डोरले यांच्या कडे निवेदन सादर केले होते.

पश्चात पतसंस्थें च्या सीएसआर( सामाजिक) निधीतून ११ हजाराचे धनादेश दि.भंडारा महिला नागरी सहकारी पत संस्थाध्यक्षा सौ.दुर्गाताई डोरले यांचे हस्ते प्रभात च्या उपचारासाठी त्यांच्या वडिलांना सोपविण्यात आले.या प्रसंगी पतसंस्था चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण साठवणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री विवेक डोरले,सईद शेख ई उपस्थित होते.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# बावनथडीच्या कालव्यात बुडून दोघांचा मृत्यू




**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तुमसर :** आंधळगाव पोलीस ठाणे हद्दीतील आंबागड गावानजीकच्या बावनथडी डावा कालवा क्र. १ (नहर) मध्ये दोन युवकांचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना ३१ जानेवारी रोजी उघडकीस आली आहे. मृतकांची नावे जागेश्वर यशवंत वाढिवे (वय २९) व दिपक अरविंद वाढवे (वय २६) अशी असून दोघेही रामपुरी, ता. लाखनी, जि. भंडारा येथील रहिवासी आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही युवक कालव्यात पोहण्यासाठी गेले असावेत. मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडाल्याची शक्यता पोलिसांनी प्राथमिक तपासात व्यक्त केली आहे. स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास दोघेही पाण्यात बुडालेल्या अवस्थेत आल्यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनास्थळी पोलिसांना दुचाकी क्रमांक एमएच ३१ डीएल ०९८८ आढळून आली असून ती मृतक युवकांचीच असावी, असा प्राथमिक अंदाज आहे. आंधळगाव पोलिसांनी तात्काळ घटनास्थळ गाठून पंचनामा केला व मृतदेह पाण्यातून बाहेर काढून शवविच्छेदनासाठी पाठविले. पुढील तपास आंधळगाव पोलीस करीत आहेत.

# शिक्षकांमुळेच विद्यार्थी व शाळा आदर्श होऊ शकतात!

■ पालकमंत्री पंकज भोयर ■ जिल्हास्तरीय शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे थाटात उद्घाटन

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद भंडारा यांच्या वतीने आयोजित सन २०२५-२६ चा जिल्हास्तरीय शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव आज ३१ जानेवारी २०२६ रोजी कोच्ची (ता. लाखांदूर) येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या मैदानावर अत्यंत उत्साहात आणि दिमाखदार सोहळ्यात संपन्न झाला. राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री तथा भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांच्या हस्ते ध्वजारोहण व मशाल प्रज्वलन करून या त्रिदिवसीय महोत्सवाचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले.



**शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे –ना.भोयर**

उद्घाटकीय भाषणात पंकज भोयर यांनी शिक्षकांच्या भूमिकेवर विशेष भर दिला. ते म्हणाले, "शासन भौतिक सुविधांसाठी निधी उपलब्ध करून देते, परंतु विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि शाळांचा दर्जा उंचावण्याचे खरे काम शिक्षकच करतात. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आता सीबीएसईच्या धर्तीवर सेमी-इंग्रजी शिक्षण दिले जात आहे. तसेच, राज्य शासनाने केंब्रिज विद्यापीठाशी केलेल्या करारामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अध्यापन पद्धतीचा लाभ आता ग्रामीण विद्यार्थ्यांनाही मिळेल."

**मान्यवरांचे मार्गदर्शन व शुभेच्छा**

कार्यक्रमाचे अध्यक्ष आ. नानाभाऊ पटोले यांनी कोच्छी/दांडेगाव ग्रामवासीयांचे कौतुक करत म्हटले की, जिल्हास्तरीय महोत्सवाचे यजमानपद भूषवणे ही गावकऱ्यांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. भंडारा-गोंदियाचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याचे आवाहन केले. यावेळी विधान परिषद सदस्य डॉ. परिणय फुके, जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. कविता उईके आणि उपाध्यक्ष एकनाथ फेंडर यांनीही सहभागी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

**असा झाला सोहळा**

सुरुवातीला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, संत गाडगे महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीमाई फुले व देवी सरस्वती यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रवींद्र सोनटक्के यांनी प्रास्ताविकातून महोत्सवाची रूपरेषा मांडली.

या सोहळ्याला मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंदकुमार साळवे, सभापती नरेश ईश्वरकर, आनंद मलेवार, शितल राऊत, अनिता नालगोपूलवर, जिल्हा परिषद सदस्य प्रियांक बोरकर, सरपंच सुरेखा देसाई, उपसरपंच मुरलीधर वावरे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत सेलोटे, मुख्याध्यापक योगेश कुटे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, केंद्रप्रमुख, शिक्षक संघटनांचे पदाधिकारी आणि साकोलीचे उपविभागीय अधिकारी निलेश कदम, तहसीलदार वैभव पवार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश कुंभारे व वंदना भोवते यांनी केले, तर आभार माध्यमिक शिक्षणाधिकारी मनिषा गजभिये यांनी मानले. या महोत्सवात जिल्ह्यातील तालुका स्तरावरील विजेते स्पर्धक आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. शिक्षण विभाग, जिल्हा परिषद भंडारा यांच्या वतीने आयोजित सन २०२५-२६ चा जिल्हास्तरीय शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव आज ३१ जानेवारी २०२६ रोजी कोच्ची (ता. लाखांदूर) येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या मैदानावर अत्यंत उत्साहात आणि दिमाखदार सोहळ्यात संपन्न झाला.

राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री तथा भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांच्या हस्ते ध्वजारोहण व मशाल प्रज्वलन करून या त्रिदिवसीय महोत्सवाचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले.

## सार्वजनिक वाचनालयात मराठी भाषा पंधरवडा विविध उपक्रमांनी साजरा



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** सार्वजनिक वाचनालय भंडारा येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय भंडारा व सार्वजनिक वाचनालय भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने इंद्रराज सभागृहात भंडारा जिल्ह्यातील विविध ग्रंथालयांना ग्रंथ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आमदार नरेंद्र भोंडेकर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी खुमेंद्र बोपचे, सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय दलाल, कार्यवाह प्रा.सुमंत देशपांडे, सहकार्यवाह हर्षल मेश्राम, डॉ.प्रकाश मालगावे,नीळकंठ रणदिवे,नारनवरे उपस्थित होते. आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्या निधीतून सार्वजनिक वाचनालय भंडाराला एक लक्ष ऐंशी हजाराचे ग्रंथ तसेच भंडारा जिल्ह्यातील एकोणसाठ ग्रंथालयांना ग्रंथांचे वाटप करण्यात आले.याप्रसंगी भंडारा जिल्ह्यातील विविध ग्रंथालयांचे कार्यवाह,ग्रंथपाल उपस्थित होते.

'मराठी भाषा संवर्धन काळाची गरज' या विषयावर आयोजित व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी प्रा.सुमंत देशपांडे हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.नरेश आंबिलकर उपस्थित होते.

संपूर्ण पंधरवड्यात सार्वजनिक वाचनालयात ग्रंथप्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते.मराठी भाषा पंधरवड्याच्या यशस्वीतेसाठी ग्रंथपाल घनश्याम कानतोडे, महेश साखरवाडे,सुधीर खोब्रागडे, युवराज साठवणे, दिनेश हरडे,मारोती वाघमारे यांनी अथक परिश्रम घेतले.

## दिपाली निखाडे यांचे निधन



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा:** श्रीमती दिपाली वसंत निखाडे वय ७६ वर्ष फ्रेंड्स कॉलनी खात रोड भंडारा यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या कृषी विभागातून सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्यांच्या मागे मुलगा, मुलगी, सुन, नातवंडे वबराच मोठा आप्त परिवार आहे.

# खापा-हसारा मार्गावर बछड्यासह वाघाचे दर्शन!



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तुमसर :** तालुक्यातील खापा-हसारा मार्गावर एका शेतामध्ये काही लोकांना दुपारी अडीच ते तीन च्या दरम्यान वाघ एका बछड्यासह फिरत असल्याचे दिसून आले. काहींनी या वाघाचे छायाचित्र आणि चित्रफीत तयार करण्याचा प्रयत्न केला. हे चित्रफित समाज माध्यमांवर पसरल्यानंतर परिसरातील लोकांनी वाघ पाहण्यासाठी शेतशिवारात गर्दी करण्यास सुरुवात केली. वाघाच्या शोधात शेतात नागरिक धावत असल्याचे दिसले. मुलांपासून जेष्ठांपर्यंत सर्वजण वाघ दिसावा म्हणून धडपडताना दिसत होते. वाघ आणि त्याचा बछडा कुटुंब असल्याचे काही प्रत्यक्षदर्शींनी यावेळी सांगितले.दरम्यान याची माहिती वनविभागाला देण्यात आल्यानंतर तुमसर चे वनपरिक्षेत्राधिकारी रहांगडाले यांनी कर्मचाऱ्यांचे पथक वाघाच्या शोधात पाठवले असल्याचे सांगितले.दरम्यान ज्या पद्धतीने नागरीक वाघाच्या दर्शनासाठी शेतात गर्दी करीत होते, तेही धोका पत्करण्यासारखे होते, हे विशेष.

आधी वाघ पाहायला जंगलात जावे लागत होते. आताही जातात, पण जे पैसे खर्च करून पर्यटन करायला जंगल भ्रमंती करतात त्यांना बरेचदा नैराश्य पदरी पडते. तर काही नशीबवान असतात, ज्यांना वाघोबाच सहज दर्शन देते.

आज खापा हसारा मार्गावर एका शेतात वाघाचे झालेले दर्शन आणि त्यानंतर वाघ बघण्यासाठी लोकांनी शेताकडे घेतलेली धाव चांगलेच चर्चेत आले. वाघ आणि बछडा असे दोघांचे दर्शन झाल्याचे प्रत्यक्षदर्शी सांगतात.

## कॉंग्रेसतर्फे महात्मा गांधी यांची पुण्यतिथी व अजितदादा पवार यांना श्रध्दांजली



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तुमसर :** तुमसर येथे कॉंग्रेसतर्फे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची ७७ वी पुण्यतिथी आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली देण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष अमर रगडे , शैलेश पडोळे, शिव बोरकर, तारेंद्र डिंकवार, गजानन लांजेवार , प्रदीप कुंभालकर, कैलास नागदेवे, दिलीप लांजेवार, महेंद्र मेश्राम, वैभव सूर्यवंशी आणि कॉंग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपस्थित नेत्यांनी महात्मा गांधी यांच्या आदर्शांना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याला श्रद्धांजली वाहिली. महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त शहीद दिवस पाळण्यात आला.

## भंडारा येथे विदर्भ महसूल सेवक संघाच्या सभेचे आयोजन



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** भंडारा येथे विदर्भ महसूल सेवक संघ जिल्हा शाखा भंडारा ची सभा घेण्यात आली.

या सभेमध्ये सर्वानुमते जिल्हयाची नवीन कार्यकारणी खालील प्रमाणे गठित करण्यात आली त्यामन्धे मार्गदर्शक नंदकिशोर भालाधरे ,जिल्हाअध्यक्ष अमोल पंचभाई ,महिला जिल्हा अध्यक्ष -सौ कुंदा बरसागडे उपाध्यक्ष राजेंद्र पंचबुधे ,सचिव अमोल कांबळेसहसचिव कैलाश गजभिये,कोषाध्यक्ष विनेश कांबळे,संघटक शैलेश खंडाते प्रसिध्दी प्रमुख राजेश चकोले व मंगेश सुखदेवे आणि पदसिद्ध सदस्य म्हणून प्रत्येक तालुक्याचे तालुका अध्यक्ष अशाप्रकारे सर्व नवनियुक्त अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव व इतर सभासद यांचे अभिनंदन करून उपस्थित सर्व महसूल सेवक यांचे आभार मानून सभा समाप्त करण्यात आली.

# तुमसर पोलिसांची दारू तस्करीवर कारवाई



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तुमसर :** तुमसर पोलिसांनी अवैध दारू तस्करीविरोधात मोठी कारवाई करत ५ लाख २२ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल शुक्रवारी जप्त केला आहे. याप्रकरणी अल्पवयीन आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस स्टेशन तुमसर अंतर्गत फियार्दी पो.ना. मन्नाड हे पोलीस स्टाफसह पेट्रोलिंग करीत असताना, विवेकानंद नगर, मुक्ताबाई शाळेच्या मागील भागात तुमसर येथे संशयास्पद हालचाली दिसून आल्या. तपासणी दरम्यान १७ वर्षांचा रा. सुदरटोला, ता. तुमसर, जि. भंडारा याच्याकडे मोठ्या प्रमाणात अवैध दारूसाठा आढळून आला. आरोपीकडून विविध कंपन्यांची देशी दारू (इलायची, सोनी सौफ, प्रिमियम गोल्ड), विदेशी बिअर (ट्युबर्ग प्रिमियम), विदेशी दारू (रॉयल स्टंग), चारचाकी वाहनासह, असा एकूण ५ लाख २२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा क्रमांक ५४/२०२६ अन्वये कलम ६५ (अ) महाराष्ट्र दारूबंदी कायदा तसेच मोटार वाहन कायद्याच्या संबंधित कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नुरुल हसन, अपर पोलीस अधीक्षक नीलेश मोरे व पोलीस निरीक्षक संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. पुढील तपास पोलीस स्टेशन तुमसर येथे सुरू आहे.

## टप्पा वार्ड येथे प्रजासत्ताक दिन साजरा

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** आदर्श बहुउद्देशीय मंडळ आंबेडकर वार्ड भंडारा व्दारा संचालित वैनगंगा उच्च प्राथमिक शाळा टप्पा वार्ड भंडारा च्या वतीने ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

ध्वजारोहण आदर्श बहुउद्देशीय मंडळ आंबेडकर वार्ड भंडारा च्या उपाध्यक्ष प्रेमाताई वाडिभस्मे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते विलास केजरकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय आट्यापाट्या संघाची कर्णधार कु. प्राची चटप, नागपूर येथील शासकीय दंत महाविद्यालयाच्या लिपिक पुजा साठवणे, योग शिक्षिका डॉ. कल्पना कोल्हे, क्रीडा शिक्षक विवेक चटप, मुख्याध्यापिका सविता गभणे, सहाय्यक शिक्षिका मंदा कटकवार, स्नेहा सेलोकर, बी. एम. खवास, वैशाली गोन्नाडे, कुसूम पुडके, कविता मांढरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# साकोलीत 'गांजा बिडी' च नाही तर, आता 'दारू अड्डे'

■ बसस्थानक झाले 'मिनी बार' मधे नशेखोरांच्या स्वाधीन ■ आता दंडात्मक व अवैध धंद्यातील अतिक्रमणे हटविण्याची नितांत गरज

**आशिष चेडगे / युवाराष्ट्र दर्शन**

**साकोली :** आता शहरात पाणी खरंच डोक्यावरून जात आहे. तर ५ दिवसांपूर्वी म्हणजे २५ जाने.ला पहाटे साकोली बसस्थानकवर चक्क "गांजा बिडी" चे अवैध धंदे सापडले होते. तेच आता बसस्थानक परिसर दारूचा "मिनी बार" बनलेले आहे. याची जिवंत छायाचित्रे व व्हिडिओ "साकोली मिडीया" ने काल ( शनि. ३१ जाने.) ला दु. ०१:१३ ला घेतलेली आहेत. काही नशेखोर समोरील हॉटेल्सच्या दुकानात बसून बसस्थानक हे आता नशेखोरांच्या स्वाधीन झाले असल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. यावर आता "साकोली सेंदूरवाफा स्थानिक निवासी" संघटनाने आक्रमक पवित्रा घेतला असून सार्वजनिक व शासकीय जागेवर असे अवैध धंदे करणा-या अवैध अतिक्रमणधारकांना नगरपरिषद मुख्याधिकारी यांनी दणका देऊन त्यांची तेथून उचलबांगडी करण्यात यावी अशी रास्त मागणी केली आहे.



सविस्तर की, शहरातील तलाव चौपाटी, जिल्हा परिषद हायस्कूल परिसर, क्रिडा संकुल मैदान, आय लव्ह साकोली बालोद्यान, शासकीय तंत्रनिकेतन मागे येथे दारूच्या बाटल्या हा काही नविन विषय नाही. पण मागील रविवार २५ जानेवारीला पहाटे बसस्थानक प्रवासी आसनाखाली सिगरेटची पॉकीटे, बिडी व गांजाची अवशेष सापडले होते. या संतप्त घटनेला पाच दिवस लोटत नाही तर काल ता. ३१ जाने. ला दु. १:१३ ला बसस्थानक मुख्य गेट आतमध्ये नविन एटीएम केंद्र बाजूला, आवार भिंती पलीकडे व बसस्थानक आतमध्ये असंख्य इंग्रजी व देशी दारूच्या बाटल्यांचा व डिस्पोझल गिलासांचा खच "युवाराष्ट्र दर्शन" साकोली मिडीया प्रतिनिधीला निदर्शनास आला. याचे त्या जागेपासून पुरावा घेत त्याच क्षणी चौफेर व्हिडिओने चित्रीकरण करण्यात आले आहे. या अती संतापजनक प्रकाराने बसस्थानक वरील सायंकाळी जाणा-या महिला विद्याथीर्नी खरंच सुरक्षित राहतील का.? रात्री परिसरात शतपावली करणा-या तरूण मुली व महिला खरंच सुरक्षित राहतील का.? हा ज्वलंत प्रश्न उभा ठाकला आहे.

सदर संतापजनक प्रकरणी आता पोलीस विभाग व नगरपरिषद विभागाने तातडीची एक्शन कारवाई करून बसस्थानक, प्रगती कॉलनी चौक, नागझिरा रोड चौक परिसरातील अशे अनेक अवैध धंद्यांतील गांजा बिडी, व देशी विदेशी दारू पिण्माचे नशेखोरांचे गुन्हेगारी अड्डे व काही हॉटेल्स टप-या उद्ध्वस्त करून या शासकीय सार्वजनिक परीसरात शांतता व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी कारवाई करण्यात यावी अशी रास्त मागणी "साकोली सेंदूरवाफा स्थानिक निवासी संघटना" मधील सर्व पदाधिकाऱ्यांनी पोलीस ठाणे व नगरपरिषदेकडे केली आहे. जेणेकरून होणा-या महिलांसोबत छेडखानी, विनयभंग, दागिने पळविणे, नशेच्या तालात दरोडा, दुकाने फोडणे, घरफोडी अश्या घटनांवर आतापासूनच आळा बसेल हा मुख्य उद्देश.

